रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५८
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ गुरुवार, १६ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## नवा अध्याय! भारत-यूके मुक्त व्यापार करार लागू



**नवी दिल्ली :** भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील बहुप्रतिक्षित आणि आधुनिक काळातील सर्वात मोठ्या व्यापार करारांपैकी एक असलेला मुक्त व्यापार करार बुधवारी (दि.१५) अधिकृतपणे लागू झाला. या ऐतिहासिक करारामुळे भारत आणि यूके यांच्यातील आर्थिक संबंधांत एक नवा अध्याय सुरू झाला असून दोन्ही देशांमधील व्यापार, गुंतवणूक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीला मोठी गती मिळणार आहे. या करारामुळे ग्राहकांना आता सर्वोत्तम भारतीय आणि ब्रिटिश उत्पादने आणि सेवा अधिक स्वस्त, जलद आणि सुलभ उपलब्ध होणार आहेत. दीर्घकाळात या करारामुळे द्विपक्षीय व्यापारात दरवर्षी २५.५ अब्ज पौंडांची भर पडेल, तर भारतीय जीडीपीमध्ये ५.१ अब्ज पौंड आणि यूकेच्या जीडीपीमध्ये ४.८ अब्ज पौंडांची वाढ होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

अंतरंग
अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे वाटपास सुरुवात/२
कडाव येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा/५
स्पेन फिफा वर्ल्डकप फायनलमध्ये दाखल/८

# शेतकऱ्यांचे थकीत वीज बिल माफ!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; कर्जमाफीबद्दल सत्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांची दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर महायुती सरकारने आता बळीराजाला आणखी एक मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे साडेसात अश्वशक्ती (हॉर्स पॉवर)पर्यंतचे तब्बल ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल पूर्णपणे माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.१५) केली.

"शेतकऱ्यांची पाटी पूर्णपणे कोरी झाली पाहिजे आणि त्याच कोऱ्या पाटीवर आपल्याला महाराष्ट्राचा नवा इतिहास लिहिता आला पाहिजे, याच एका ध्येयाने आम्ही हा धाडसी निर्णय घेतला आहे," अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील लाखो शेतकऱ्यांवरील थकीत बिलांचे संकट कायमचे दूर केले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे भाजप किसान मोर्चातर्फे आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दलच्या कृतज्ञता सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.

या सोहळ्यास कृषिमंत्री दत्ता भरणे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार संजय कुटे यांच्यासह राज्यातील विविध भागांतून आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी वीज बिल माफीच नव्हे, तर राज्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याची आणि कर्जमाफीतील जाचक अटी पूर्णपणे रद्द करण्याची घोषणा केली.

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांचे



सध्याचे वीज बिल सरकारने आधीच माफ केले आहे, मात्र शेतकऱ्यांच्या नावावर जुनी थकीत बिले कागदोपत्री तशीच असल्याने नवीन वीज कनेक्शन घेताना किंवा इतर कामांत त्यांना अडचणी येत होत्या. ही टांगती तलवार दूर करण्यासाठी आम्ही ४८ हजार कोटींचे थकीत वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला. या वीज बिल माफीचा बोजा सर्वसामान्यांच्या बिलावर पडू नये म्हणून राज्य सरकार दरवर्षी अर्थसंकल्पातून तब्बल २५ हजार कोटी रुपये वीज वितरण कंपनीला (महावितरण) देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

रात्रीच्या वेळी शेतात पाणी देताना शेतकऱ्यांना सर्पदंश आणि अन्य जीवघेण्या संकटांना सामोरे जावे लागते. या त्रासातून शेतकऱ्यांची कायमची मुक्तता करण्यासाठी सरकारने सौर कृषी वाहिनी आणि सौरपंप योजना गतीने राबवली आहे. सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात असून या वर्षाअखेरपर्यंत हे प्रमाण १०० टक्क्यांवर नेण्याचे आणि शेतकऱ्यांना दिवसा आठ ते १२ तास पूर्णपणे मोफत वीज देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

> **५० हजार गटशेतीचे लक्ष्य**
> "कर्जमाफीने शेतकरी तात्पुरता मोकळा होतो, पण कर्जाच्या विळख्यातून कायमचा बाहेर पडत नाही. शेती फायद्यात आणायची असेल, तर प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग, बाजारपेठांची उपलब्धता आणि नवीन तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे. यासाठी सरकार येत्या दोन-तीन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात ५० हजार गटशेती (ग्रुप फार्मिंग) गट तयार करणार असून त्यांना शासनाच्या सर्व योजना व आवश्यक तो निधी थेट पुरवला जाईल," अशीही घोषणा मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी केली.

दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी आणि नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देताना सुरुवातीला काही अटी घालण्यात आल्या होत्या. आर्थिक शिस्त राखण्यासाठी २०१९च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्यांना नवीन योजनेतून वगळण्यात आले होते, परंतु आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या २५-३० आमदारांनी माझी भेट घेऊन ही अट रद्द करण्याची मागणी केली, अन्यथा राज्यातील १२ लाख शेतकरी या लाभापासून वंचित राहिले असते. आमदारांचा हा आग्रह मान्य करत सरकारने ही अट रद्द केली असून आता थकीत झालेल्या त्या १२ लाख शेतकऱ्यांनाही या दोन लाखांच्या कर्जमाफीचा सरसकट लाभ मिळणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यंदा 'अल निनो'चे संकट असल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणी आणि दुष्काळाचे सावट आहे. अशा परिस्थितीत प्रोत्साहनपर ५० हजार रुपये मिळवण्यासाठी चालू वर्षाचे कर्ज भरणे आवश्यक आहे ही अट अन्यायकारक होती. आम्ही ही अटही बाद केली असून आता मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा लाभ थेट दिला जाईल तसेच ज्यांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा थोडे अधिक आहे, अशा शेतकऱ्यांनाही सरकारने वाऱ्यावर सोडलेले नाही. दोन लाखांच्या वरील उर्वरित रक्कम शेतकऱ्याने भरल्यास त्यांनाही दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा फायदा दिला जाणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आश्वस्त केले.

"जर आम्हाला केवळ आणि केवळ राजकारणच करायचे असते, तर २०२९च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आम्ही या कर्जमाफीचा पत्ता टाकला असता, परंतु आम्ही शेतकऱ्यांच्या हिताच्या आड आणि बळीराजाच्या जीवावर कधीही राजकारण करणार नाही" अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांना चोख उत्तर दिले.

## 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.०'ला मंजुरी

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताला जागतिक स्तरावर इलेक्ट्रॉनिक्स आणि हायटेक मॅन्युफॅक्चरिंगचे केंद्र बनवण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी (दि.१५) एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.०'ला मंजुरी देण्यात आली आहे.

देशात चिप आणि सेमीकंडक्टर इकोसिस्टमचा पूर्णपणे विकास करण्यासाठी सरकारने तब्बल १.२७ लाख कोटी रुपयांच्या भरीव बजेटची घोषणा केली आहे. यासोबतच देशातील मोबाइल फोन उत्पादनाला आणखी



चालना देण्यासाठी ६२,५०० कोटी रुपयांच्या मोबाइल फोन मॅन्युफॅक्चरिंग स्कीमलाही मंजुरी देण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्रीय मंत्रिमंडळ आणि आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने एकूण सात महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या सर्व निर्णयांशी संबंधित प्रकल्प आणि योजनांची एकत्रित किंमत २.१९ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. या निर्णयांमध्ये सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासोबतच पायाभूत सुविधा, खत व रेल्वेशी संबंधित प्रकल्पांचाही समावेश आहे.

या निर्णयांच्या माध्यमातून भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षमता वाढवणे आणि जागतिक सेमीकंडक्टर पुरवठा साखळीतील देशाचे स्थान अधिक मजबूत करण्यावर मोदी सरकारचा भर असणार आहे.

## पर्यटकांवर हल्ला; आरोपींना कोठडी

**नाशिक : प्रतिनिधी**

इगतपुरीमधील भावली धरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या कुटुंबावर प्राणघातक हल्ला आणि विनयभंगप्रकरणी नऊ आरोपींना न्यायालयाने १८ जुलैपर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे.

नाशिक शहरातील एक कुटुंब भावली धरण परिसरात गेले असता एका तरुणाने महिलेची छेड काढली. त्याबद्दल जाब विचारल्यानंतर टोळक्याने कुटुंबाला धक्काबुक्की केली. यामुळे घाबरून हे कुटुंब घरी निघाले असता टोळक्याने त्यांचा पाठलाग करून मोटारीवर हल्ला करून मारून तोडफोड केली होती. पोलिसांनी संशयितांची धिंड काढली असून फरार तीन आरोपींचा शोध सुरू आहे.

## विनायक राऊत यांच्यासह कुटुंबीयांच्या अडचणीत वाढ

### अंतरिम संरक्षणास कोर्टाचा नकार

**ठाणे : प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत, त्यांचा मुलगा गितेश राऊत आणि कुटुंबातील अन्य सदस्यांना मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने त्यांना मुख्य सुनावणीपर्यंत कोणताही तात्पुरता दिलासा किंवा अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला आहे.



विनायक राऊत यांच्या सून गिरीजा राऊत यांनी पती, सासरे आणि कुटुंबातील इतर सदस्यांविरोधात कौटुंबिक छळ तसेच नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी एकूण सात जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणात अघोरी कृत्यांशी संबंधित आरोपांवरून फिरोज शेख नावाच्या व्यक्तीला जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, अंतरिम अटकपूर्व जामिनासाठी दाखल करण्यात आलेल्या अर्जांवर सुनावणी करताना न्यायालयाने आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन दिलासा देण्यास नकार दिला. अटकपूर्व जामीन अर्जावर मुख्य सुनावणी २३ जुलै रोजी होणार आहे.

## निवडक

### मोशी दुर्घटनेप्रकरणी दोन अभियंते निलंबित

**पुणे :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. मोशी डेपोत वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या तीन मजली अनधिकृत इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून १२ कामगार जखमी झाले आहेत.

### नवी मुंबई विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने बुधवारी (दि.१५) पहिल्या नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवेचे यशस्वी स्वागत करत इतिहास रचला. अबूधाबीहून आलेले एअर इंडिया एक्स्प्रेसचे आयएक्स-२०८ हे विमान सकाळी १०.२० वाजता विमानतळावर दाखल झाले. आगमनानंतर पारंपरिक वॉटर कॅनन सलामी देऊन त्याचे स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने नवी मुंबई विमानतळावरील आंतरराष्ट्रीय विमानसेवेचा शुभारंभ झाला आहे.

## कशेडी घाटात दरड कोसळली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी घाटात मंगळवारी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास दरड कोसळली. त्यामुळे मुंबई लेनवरील वाहतूक बंद पडली. यानंतर गोव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक दुहेरी करून मुंबईकडे जाणारी वाहने या लेनवरून मार्गस्थ करण्यात आली.

पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे व महाड प्रांताधिकारी डॉ. पोपट ओमासे यांनी घटनास्थळी पाहणी करून कशेडी घाटातील वाहतूक पोलीस आणि पोलादपूर पोलिसांना वाहतूक व्यवस्थेसंदर्भात सूचना केली. यावेळी महाड औद्योगिक वसाहतीतील सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे हेदेखील दरडप्रवण क्षेत्रात हजर झाले आणि त्यांनी बॅरिकेट्स लावून गोव्याकडे जाणाऱ्या वाहनांची सरळमार्गी वाहतूक सुरू करून मुंबईकडे जाणारी वाहने या लेनवरून रवाना केली.




दरम्यान, दरड हटविण्यासाठी बुधवारी (दि. १५) महामार्गावरील ठेकेदार कंपनी लार्सन अँण्ड टुब्रोकडून सुरुवात झाल्यावर एखाद तासानंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे दरडीतील लाल मातीचा ढिगारा निसरड्या चिखलात रूपांतरीत झाला. परिणामी काही काळ अडथळा झाला. दोन तासांनी मुंबईकडे जाणारी लेन एकेरी वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. सायंकाळी संपूर्ण वाहतूक पूर्ववत झाली.

## स्व. अजितदादांची जयंती होणार साजरी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्व. अजित पवार यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. यासंदर्भातील परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी (दि.१५) जारी केले.



परिपत्रकात दिलेल्या माहितीनुसार स्व. अजित पवार यांची जयंती २२ जुलै रोजी राज्यभरात साजरी केली जाणार आहे. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये अजितदादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाणार आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या भागातील सर्व आस्थापनांमध्ये या कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्येही जयंती साजरी होणार आहे.

शासनाचा हा निर्णय म्हणजे अजितदादांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाला आणि कार्यपद्धतीला दिलेली ही एक मोठी आदरांजली मानली जात आहे.



**पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या गव्हाण जिल्हा परिषद विभागीय चिटणीसपदी चेतन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीमुळे गव्हाण गावाला एक युवा नेतृत्व मिळाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. चेतन पाटील यांनी नुकतीच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर उपस्थित होते.**

## माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान



> **अनन्यसाधारण महत्त्व**
> माऊलींच्या पालखी सोहळ्यात नीरा स्नानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पालखीचा अर्धा टप्पा पूर्ण झाल्यावर सातारा जिल्ह्यात प्रवेशापूर्वी माऊलींच्या पादुकांना पुणे व सातारा जिल्हाची सीमा असलेल्या नीरा नदीच्या प्रसिद्ध दत्तघाटावर स्नान घातले जाते. परंपरेनुसार यंदाही मानकऱ्यांनी माऊलींच्या पादुका दत्तघाटावर आणल्या आणि मोठ्या उत्साहात त्यांना पवित्र तीर्थात स्नान घालण्यात आले.

**नीरा : प्रतिनिधी**

माऊली माऊली नामाचा जयघोष करीत, टाळ-मृदंगाच्या गजरात नीरा नदीच्या पवित्र तीर्थात बुधवारी (दि.१५) संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांना स्नान घालण्यात आले. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी दत्तघाटावर तसेच नदी तिरावर एकच गर्दी केली होती.

वाल्हा येथून बुधवारी सकाळी निघालेला माऊलींचा पालखी सोहळा १० वाजता नीरा नगरीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दाखल झाला. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांकडून पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर साडेदहा वाजता पालखी नीरा नदीच्या काठावर विसावली. या ठिकाणी नीरा पंचक्रोशीतील हजारो भाविक दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारचे भोजन आणि विसावा घेतल्यानंतर दुपारी १ वाजता पालखी पुणे जिल्ह्याचा निरोप घेत हैबतबाबांची जन्मभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यातील लोणंद मुक्कामासाठी रवाना झाली.

## क्रिकेट वर्ल्डकपचे फॉरमॅट बदलले!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वनडे आणि टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. आयसीसीने नव्या स्वरूपाची घोषणा केली.

पुढील वनडे वर्ल्डकप २०२७मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया यांच्या यजमानपदाखाली होणार आहे. हा विश्वचषक १४ संघांमध्ये खेळवला जाणार आहे, परंतु नवीन फॉरमॅटमुळे मुख्य फेरीत केवळ १२ संघ सहभागी होतील. याव्यतिरिक्त उपांत्य फेरीतील संघ निश्चित करण्यासाठी पहिल्यांदाच सुपर-७ फेरी खेळवली जाईल.

आगामी टी-२० वर्ल्डकप २०२८मध्ये ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये होईल. या स्पर्धेत एकूण २० संघ भाग घेणार आहेत. सुपर ८ऐवजी सुपर १० फॉरमॅट असणार आहे. म्हणजेच पहिल्या टप्प्यातील २० पैकी १० संघ या फेरीत पात्र ठरतील. त्यानंतर फक्त दोन संघ सरळ उपांत्य फेरी गाठणार आहेत. बाकीच्या दोन संघांना एलिमिनेटर सामने खेळून उपांत्य फेरीत जागा मिळवावी लागणार आहे.

## 'आरडीसीए'च्या तीन खेळाडूंची 'एमसीए'च्या शिबिरासाठी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (आरडीसीए) तीन युवा खेळाडू कौस्तुभ म्हात्रे (पेण) २३ वर्षांखालील मुलांच्या गटात, अमेय पाटील (उरण) १९ वर्षांखालील मुलांच्या गटात आणि रोशनी पारधी (महाड) हिची महाराष्ट्राच्या महिलांच्या वरिष्ठ संघाच्या निवड चाचणी शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे.





रायगडच्या तिन्ही गुणवान खेळाडूंनी सातत्याने केलेल्या आपल्या उत्कृष्ट खेळाच्या कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) निवड चाचणी शिबिरात स्थान मिळवले आहे. निवड चाचणी शिबिर पुणे येथे होणार असून या शिबिरातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड महाराष्ट्राच्या मुख्य संघात केली जाणार आहे.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य व क्रिकेटप्रेमी नागरिकांनी रायगडच्या तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले असून भविष्यात त्यांनी महाराष्ट्राच्या संघात स्थान मिळवून जिल्ह्याचे नाव अभिमानाने उज्ज्वल करावे, अशी आशा व्यक्त केली आहे.

गेल्या काही काळापासून रायगड जिल्ह्यातील खेळाडूंची निवड महाराष्ट्राच्या संघात होत असल्याने युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना जलद गतीने पूर्ण करा!

## मुख्यमंत्र्यांचे कंत्राटदारांना आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरवासीयांना पुरेसा पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम गतीने पूर्ण करून शहरवासीयांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी आयोजित आढावा बैठकीत दिले.

बैठकीस सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार डॉ. भागवत कराड उपस्थित होते.



दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सहभाग घेतला. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, कंत्राटदाराने व संबंधित यंत्रणांनी योजनेचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी टप्पे पाडावेत. योजनेची अर्धवट झालेली कामे कंत्राटदाराने तातडीने पूर्ण करावीत. पाण्याच्या टाक्यांची बांधकामे पूर्ण करावीत आणि शहरातील वितरण प्रणालीचे कामही पूर्णत्वास न्यावे. अर्धवट कामांमुळे शहरवासीयांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करता येत नाही. संबंधित विभागाने स्थळ पाहणी करून सद्यस्थितीबाबत कंत्राटदारासोबत स्वतंत्र बैठक घ्यावी.

कुठल्याही परिस्थितीत योजनेचे काम विहित कालावधीत पूर्ण करावे. शेवटच्या शहरवासीयाला नियमित व शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यानुसार महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करून योजना पूर्णत्वास न्यावी. शहरातील नळ जोडण्या देण्याचे प्रमाण वाढवावे. कंत्राटदाराच्या कामाचे मूल्यांकन करून वेळोवेळी कामाचा आढावा घ्यावा. कंत्राटदाराकडून पाणीपुरवठा वितरण प्रणालीचे 'हायड्रोलिक टेस्टिंग' पूर्ण करून घ्यावे. योजनेचे काम विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. योजनेच्या कामाचा टप्पेनिहाय आराखडा बनवून पुढील बैठकीत सादरीकरण करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

जुन्या पाणीपुरवठा वितरण प्रणालीच्या रेस्टोरेशनचे कार्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावे. रिस्टोरेशनचे कार्य गतीने पूर्ण करून खोदलेले रस्ते आणि खड्ड्यांची दुरुस्ती करावी. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शहरात कुठेही खड्ड्यांमुळे अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.बैठकीत पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव पराग जैन यांनी सादरीकरण केले. बैठकीस संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती अध्यक्ष अनिल मकरिये, अपर मुख्य सचिव के. गोविंदराज, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव नायक, महापालिका आयुक्त अमोल येडगे, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त जी. श्रीकांत आदी उपस्थित होते.

दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनीही सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर शहराच्या २०५२ मधील लोकसंख्येला ६०४ एमएलडी पाणीपुरवठा गृहीत धरून जायकवाडी प्रकल्पावरून पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. पाणी वितरणासाठी शहरात ५९ पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार असून त्यापैकी २९ टाक्या पूर्ण झाल्या आहेत. शहरात १९११ किलोमीटर पाणीपुरवठा वितरण प्रणालीपैकी १२९१ किलोमीटर पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे.

# रायगड जि.प.कडून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे वाटपास सुरुवात



**अलिबाग : प्रतिनिधी**

अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केवळ मदतीची घोषणा न करता रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली आहे. अलिबाग तालुक्यातील काही शेतकऱ्यांना बुधवारी (दि. १५) प्रातिनिधिक स्वरूपात बियाणे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषदेचा हा उपक्रम अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास समिती सभापती वैकुंठ पाटील, अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, वित्त व लेखाधिकारी राहुल कदम, भाजप महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा डॉ. मंजुषा कुद्रीमोती, कृषी विभागातील कर्मचारी आणि लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. या उपक्रमासाठी जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात केवळ १० लाखांची तरतूद होती, मात्र आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन ५० लाखांची विशेष तरतूद करण्यात आली.

त्यामुळे अतिवृष्टीत नुकसान झालेल्या जिल्ह्यातील जवळपास १२ हजार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार असल्याचे कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले. मागील आठवड्यात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकाराने सेस फंडांतर्गत ७५ टक्के अनुदानावरील भातबियाणे योजना तातडीने अंमलात आणली आहे.

शासनाच्या मदतीची वाट न पाहता जिल्हा परिषद शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आली आहे. बाजारात १००० ते १२०० रुपयांना मिळणारी महाबीज बियाण्यांची पिशवी केवळ १३५ रुपयांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील दुबार पेरणीचे ओझे हलके होणार आहे.

# पोलादपुरात कार-मोटरसायकलची धडक; दोन जण गंभीर जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पोलादपूर प्रभातनगर येथे बुधवारी (दि. १५) सकाळी १० वाजता मोरसायकल आणि कारची धडक होऊन दोघे गंभीर जखमी झाले. कार चालक आणि मोटारसायकलस्वार यांना तातडीने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार आठ दिवसांपूर्वी स्कायवॉकसाठी गर्डर बसविताना पोलादपूर शहरातील प्रभातनगर पश्चिम येथे सर्व्हिस रोडवरील वाहनांना मुंबईकडे जाण्यासाठी डिव्हायडर कापून रस्ता देण्यात आला होता, मात्र राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडून या ठिकाणी पुन्हा डिव्हायडर बसवूनही सर्व्हिस रोडवरील वाहनांना महामार्गावर येण्यास मज्जाव करण्यात आला नव्हता. त्यामुळे या ठिकाणी वाहनांची ये-जा सुरू होती आणि याच निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला.

या अपघातात मोटारसायकलस्वाराचा पाय मोडला असून कारची एअरबॅग उघडल्याने कारचालकाच्या उजव्या कानाला जोरदार फटका बसून गंभीर दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच काळभैरव रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर, स्थानिक नागरिक आणि पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही जखमींना रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर या ठिकाणच्या असुरक्षित व्यवस्थेबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# पनवेलमधील वृक्षांची संयुक्त पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटनांची गंभीर दखल घेऊन आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार बुधवारी (दि. १५) उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण) स्वरूप खारगे यांनी शहरातील विविध सार्वजनिक रस्त्यांलगतच्या वृक्षांची संयुक्त पाहणी केली. यावेळी वृक्ष प्राधिकरण विभागाचे विभाग प्रमुख विवेक जळे तसेच संबंधित अभियंते उपस्थित होते.



संयुक्त पाहणीदरम्यान अनेक वृक्षांच्या बुंध्याभोवती सिमेंट काँक्रिट, डांबर, पेव्हर ब्लॉक तसेच इतर अभेद्य बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले. अशा प्रकारच्या काँक्रिटीकरणामुळे वृक्षांच्या मुळांना आवश्यक हवा आणि पाणी यांचा पुरवठा होत नाही. परिणामी मुळांची नैसर्गिक वाढ खुंटून वृक्षांची जमिनीवरील पकड कमकुवत होते. त्यामुळे अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्याच्या वेळी वृक्ष उन्मळून पडण्याचा धोका वाढतो.या बाबीची गांभीर्याने दखल घेत उपायुक्त स्वरूप खारगे यांनी संबंधित अभियंत्यांना अशा ठिकाणांचे तातडीने सर्वेक्षण करून वृक्षांच्या बुंध्याभोवती असले अतिरिक्त काँक्रिटीकरण, सिमेंट काँक्रिट व पेव्हर ब्लॉक काढून मोकळी मातीची जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

भविष्यात रस्ते, पदपथ, सुशोभीकरण व इतर विकासकामांदरम्यान वृक्षांच्या संरक्षणासाठी आवश्यक खुली जागा राखण्याबाबतही निर्देश देण्यात आले. पनवेल महानगरपालिकेमार्फत सर्व गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच खासगी वृक्षधारकांना आवाहन आहे की, त्यांच्या आवारातील वृक्षांच्या बुंध्याभोवती असलेले पेव्हर ब्लॉक, सिमेंट काँक्रिट अथवा इतर अभेद्य बांधकाम आवश्यक त्या प्रमाणात काढून मुळांना हवा, पाणी व नैसर्गिक वाढीसाठी मोकळी जागा द्यावी. तसेच पावसाळ्यात धोकादायक, वाळलेले किंवा झुकलेले वृक्ष अथवा फांद्या आढळल्यास तत्काळ परवानगी घेऊन कार्यवाही करावी.

> **पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि नागरिकांची सुरक्षितता या बाबींना सर्वोच्च प्राधान्य देत पनवेल महानगरपालिका आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना सातत्याने राबवत आहे. या मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग व सहकार्य करावे.**
>
> **-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल मनपा**

# रयत सेवक बँकेचा सभासद संवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत सेवक को-ऑप. बँक लि., सातारा शाखा, वाशी नवी मुंबई यांच्या वतीने सोमवारी (दि. १३) मॉडर्न स्कूल वाशी येथे सभासद संवाद दौरा आयोजित करण्यात आला. या भेटीद्वारे सभासदांना बँकेच्या विविध योजना आणि सुविधांची माहिती देण्यात आली. या संवाद दौऱ्याच्या माध्यमातून सभासदांना बँकेच्या विविध कर्ज योजना, ठेवी योजना, बँकेची प्रगती तसेच उपलब्ध बँकिंग सुविधांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.



सभासदांच्या अडीअडचणी, सूचना व अपेक्षा जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी शाखा समितीचे चेअरमन प्रा. किशोर सुरेश पाटील, संचालक राजेंद्र शिर्के, सभासद प्रतिनिधी नितीन ठाकूर, विलास गांगड, शाखाधिकारी प्रदीप माने तसेच राजू पठाण यांनी उपस्थित सभासदांशी संवाद साधून बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भोसले मॅडम, कार्यालयीन प्रमुख पवार सर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी बँकेच्या योजनांविषयी समाधान व्यक्त करत अशा संवाद उपक्रमांचे स्वागत केले.

# नवीन पनवेल पोस्टात ज्येष्ठांसाठी स्वतंत्र काउंटर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल पोस्ट कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते आदित्य अशोक जानोरकर यांनी याबत पोस्टमास्टरांकडे निवेदन दिले होते. त्यानुसार टपाल विभागाने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नवीन पनवेल पोस्ट कार्यालयात जवळपास १० काउंटर आहेत, मात्र त्यापैकी निम्म्याहून अधिक काउंटर बंद असल्यामुळे नागरिकांना गर्दीत उभे राहावे लागत होते. याबत आदित्य जानोरकर यांनी तक्रार करून संबंधित अधिकाऱ्यांसोबत पत्रव्यवहार केला होता.

ज्येष्ठ नागरिकांना रांगेत उभे राहण्याची गैरसोय टाळण्यासाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्याची मागणी त्यांनी केली होती. त्याची दखल घेत पोस्ट कार्यालयाने ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर कार्यान्वित केला आहे. आदित्य जानोरकर यांनी यासोबतच सध्या बंद असलेले इतर काउंटर देखील सुरू करण्याची मागणी केली आहे. पोस्ट बँकेसाठी एक स्वतंत्र काउंटर आणि मल्टीपर्पज व्यवहारांसाठी एक काउंटर द्यावा, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

# सर्वसाधारण सभेतील ठरावांची गतीने अंमलबजावणी करा; महापौरांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका निवडणुकांनंतर सुरू झालेल्या सर्वसाधारण सभांमध्ये मंजूर झालेल्या विविध ठरावांच्या अंमलबजावणीचा आढावा महापौर सुजाता पाटील यांनी विशेष बैठक घेऊन घेतला. नागरी सुविधांसंबंधित कामे गतीने पूर्ण करण्यावर यावेळी भर देण्यात आला.



या बैठकीला उपमहापौर दशरथ भगत, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, सभागृहनेते सागर नाईक, आरोग्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ, नगरसेवक जयवंत सुतार, सुधाकर सोनवणे, सुरज पाटील, दत्तात्रय घरत, अंजनी भोईर, नेत्रा शिर्के, शुभांगी पाटील यांच्यासह अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्वीजय चव्हाण आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

प्रथम सर्वसाधारण सभा २० फेब्रुवारी रोजी झाली. दरमहाच्या सभांमध्ये नागरी सुविधा, नागरी प्रश्नांची सोडवणूक आणि आर्थिक नियोजनासंबंधित विविध ठराव मंजूर झाले आहेत.

# एमएनएम विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत कनिष्ठ विज्ञान विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या निकालामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.



यंदाच्या परीक्षेत पाचवीच्या वर्धन लक्ष्मण भगत या विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती प्राप्त करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तसेच पाचवीतील रुही पाटील, आर्य भगत, साईश ठाकूर, सांधवी घरत, अनन्या जांभळे, गौरव उमेशकुमार सिंग, निती कोळी, प्रांजल पवार, साईनाथ गर्जे, वैष्णवी शर्मा आणि आठवीतील अपेक्षा पाटील या विद्यार्थ्यांनीही यशस्वीरित्या उत्तीर्ण होत विद्यालयाचा गौरव वाढवला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवळकर, पर्यवेक्षक व शिक्षक उपस्थित होते. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या पाचवीच्या समन्वयक शिक्षिका शुभांगी थोरात आणि आठवीच्या समन्वयक शिक्षिका जयश्री देशमुख यांच्या विशेष परिश्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले.

# अंजुमन डिग्री कॉलेजमध्ये करिअर संसद

**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे विद्यार्थ्यांची 'करिअर संसद' स्थापन करण्यात आली.

प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'करिअर संसद शपथविधी सोहळ्यात' निवड झालेल्या विद्यार्थी प्रतिनिधींनी विविध मंत्रीपदांची शपथ घेतली. महाविद्यालय नियुक्ती समिती आणि करिअर कट्टा यांच्या संयुक्त आयोजनाखाली हा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी, लोकशाही मूल्ये, संघटन कौशल्य, निर्णयक्षमता तसेच व्यक्तिमत्त्व विकास घडविणे हा या करिअर संसदेचा उद्देश आहे.यावेळी प्राचार्य डॉ. साजिद शेख म्हणाले की, करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. त्याचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावा. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा, रोजगार, उद्योजकता, कौशल्य विकास व व्यक्तिमत्त्व विकास याबत जागरूकता निर्माण होईल.कार्यक्रमात दळवी आयेशा अल्ताफ यांनी मुख्यमंत्री, आष्टीकर सादान सज्जाद यांनी नियोजन मंत्री, कुरेशी शीफा सईद यांनी माहिती व प्रसारण मंत्री, कोतवाल सई संजय यांनी उद्योजकता विकास मंत्री, काझी शारीब शहझाद यांनी कौशल्य विकास मंत्री, जामकर समीर ऋषिकेश यांनी रोजगार व स्वयंरोजगार मंत्री, नारकर अक्सा शबाब यांनी महिला व बालकल्याण मंत्री, पंगारकर अय्यान शराफत यांनी कायदे व शिस्तपालन मंत्री, कादिरी बाझीला झमीर यांनी सामान्य प्रशासन मंत्री, भालदार युसुफ साकिब यांनी संसदीय कामकाज मंत्री तर उल्डे अरफात अबरार यांनी सदस्य म्हणून शपथ घेतली.

महाविद्यालयीन समन्वयक प्रा. जावेद खान यांनी करिअर कट्टा उपक्रमाची माहिती देत विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास कार्यक्रम, उद्योजकता आणि रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना नेतृत्व, प्रशासन, लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

# कामोठ्यातील पदपथ झाले मोकळे!

## अनधिकृत दुकानांवर पनवेल मनपाची कारवाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार प्रभाग समिती क अंतर्गत कामोठे परिसरात अनधिकृत अतिक्रमण आणि अनधिकृत चिकन व मटण दुकानांवर धडक कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या उपस्थितीत आणि प्रभाग समिती क चे प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली कामोठेतील अनधिकृत चिकन व मटण दुकानांवर कारवाई करण्यात आली.

त्याचबरोबर कामोठे मेन रोड ते मानसरोवर रेल्वे स्थानक या मार्गावरील फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय आणि अतिक्रमणांवर प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी फुटपाथवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी मार्ग मोकळा करण्यात आला.

दरम्यान, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता तसेच रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ पादचारी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहतील, असे पनवेल महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

# पनवेल शहर वाहतूक शाखेची संकटसमयी नागरिकांना मदत



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी आणि अंमलदार वाहतूक नियमनासोबतच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठीही तत्पर असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले.

नवीन पनवेल सिग्नल येथे कर्तव्य बजावत असताना पोलीस नाईक विश्वनाथ पाटील आणि पोलीस शिपाई संजय घाडगे यांच्या निदर्शनास एका टेम्पोचालकास अचानक फिट आल्याचे दिसले. दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन संबंधित चालकावर प्राथमिक उपचार केले. चालक शुद्धीवर आल्यानंतर वाहन मालकाशी संपर्क साधून त्याला भावेश मालपाणी (रा. पनवेल) यांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी चालकाला वाहनासह रुग्णालयात रवाना करण्यात आले.

दुसऱ्या घटनेत त्याच ठिकाणी कर्तव्यावर असताना एमएच-०६-सीव्ही-४६०९ क्रमांकाच्या वाहनाने एका स्कुटीला धक्का दिला. त्यात एक इसम खाली पडून जखमी झाला. माहिती मिळताच पोलीस नाईक विश्वनाथ पाटील आणि पोलीस शिपाई संजय घाडगे यांनी तत्काळ जखमीला रिक्षामधून पटवर्धन हॉस्पिटल येथे उपचारासाठी रवाना केले. संबंधित दुचाकी चालविणारी महिलादेखील त्यांच्यासोबत होती.

या दोन्ही घटनांमध्ये वाहतूक पोलिसांनी दाखविलेली तत्परता, मानवतावादी दृष्टिकोन आणि वेळेवर दिलेली मदत यामुळे जखमींना त्वरित उपचार मिळू शकले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांच्या या कार्याचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले आहे.

# पनवेल पंचक्रोशीतील शैक्षणिक परिवर्तनात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अतुलनीय योगदान -वाय.टी. देशमुख

## गव्हाण विद्यालयात अकरावीचा प्रवेशोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचक्रोशीतील शैक्षणिक वृद्धी व परिवर्तनामध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान अतुलनीय असून अनेक गरजवंतांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी आपले हक्काचे नातेवाईक वाटावे इतक्या आपुलकी आणि जिव्हाळ्याने त्यांचा मदतीचा हात सदैव तत्पर असतो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व विद्यालयाच्या उच्च माध्यमिक विभाग स्थानिक शाळा समितीचे सदस्य वाय. टी. देशमुख यांनी केले. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशीत इयत्ता अकरावीतील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव समारंभ बुधवारी (दि.१५) रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षीय भाषणामध्ये वाय.टी. देशमुख यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला.

विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना जिद्दीने अभ्यास करून आपली गुणवत्ता वाढवावी व विद्यालयाच्या शिस्तीचे पालन करावे आणि उत्तम ज्ञान व आचरणाने या देशाचे सुजाण नागरिक बनावे, असे आवाहनही त्यांनी केले. चालू शैक्षणिक वर्षातील इयत्ता अकरावीसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गव्हाण येथील उच्च माध्यमिक विद्यालयास उत्स्फूर्त प्राधान्य दिल्याने प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली. यावेळी इयत्ता बारावीच्या मुला-मुलींनी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नवागतांवर पुष्पवृष्टी करून चैतन्यमय वातावरण निर्माण केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मोफत वह्यांसह गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यालयाच्या उच्च माध्यमिक विभागाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या समारंभास स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे सदस्य ॲड. राहुल घरत यांच्यासह विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय उगले, शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष कुंदन मोकल, उच्च माध्य. शिक्षक माणिक घरत, करुणा तांडेल, अर्चना पाटील, जयराम सोनटक्के, विठ्ठलसिंग पाटील तसेच ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, इतर शिक्षक व मान्यवर तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी उच्च माध्यमिक विभागाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य ॲड. राहुल घरत व स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनी मनोगत व्यक्त करताना नवागत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी प्रवेशोत्सव सोहळ्याचा हेतू व प्रयोजन सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुणवत्ता वृद्धीसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

यावेळी इयत्ता बारावीची विद्यार्थिनी कु. जानवी जाधव हिने प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून मनोगत व्यक्त करताना संजय उगले यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत व सर्व समिती सदस्यांच्या व प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाची उत्तम शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होत असल्याचे सांगून यापुढेही ही यशाची परंपरा कायम राखण्याचा संकल्प केला. ज्युनियर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक माणिक घरत यांनीही आपले समयोचित विचार व्यक्त केले.

एसएससी परीक्षेत विद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी कु. रेणू प्रसादने याच विद्यालयात इयत्ता अकरावीला प्रवेश घेतल्याबद्दल तिचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. प्रवेशोत्सव सोहळ्याचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले, तर मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर यांनी आभार मानले. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने उच्च माध्यमिक विभागाच्या स्थानिक शाळा समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने अध्यक्षांच्या हस्ते ॲड. राहुल घरत यांचा विशेष सन्मान करून अभिनंदन करण्यात आले.

# जिप शाळांचे पनवेल मनपाकडे तातडीने हस्तांतरण करा!

## नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांची आयुक्तांकडे मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणाऱ्या प्राथमिक शाळांचे तातडीने हस्तांतरण करावे, अशी मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी पनवेल महापालिकेच्या आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे. पनवेल पालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या ५१ प्राथमिक शाळा सध्या पालिकेकडे हस्तांतरित होणे बाकी आहेत. या शाळांमध्ये सुमारे सात हजार ७५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या शाळांच्या इमारती, वर्ग खोल्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, संरक्षण भिंत, वीज पुरवठा तसेच इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या आणि जीर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे शाळांची स्थिती "ना घर का, ना घाट का" अशी झाली. पालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आबाधित राहावे आणि त्यांच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये, यासाठी या शाळा महापालिकेकडे तातडीने हस्तांतरित करून घेणे आवश्यक आहे, असे डॉ. भगत यांनी पत्रात नमूद केले आहे.


# वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत

**उरण : रामप्रहर वृत्त, वार्ताहर**



रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे इयत्ता ११ वीमध्ये प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. प्रवेशोत्सवानिमित्त नवागत विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णा कडू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबूराव पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना विद्यालयाची उज्ज्वल निकाल परंपरा, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त आणि विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. यशस्वी वाटचालीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी विद्यार्थी शिस्त, गणवेश, नियमित उपस्थिती आणि अध्यापन प्रक्रियेबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. प्रमुख पाहुणे कृष्णा कडू यांनी विद्यालयाचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला. अभ्यासाबरोबरच विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून विद्यालयाची परंपरा अधिक समृद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले.



कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राजू खेडकर यांनी केले. प्राध्यापिका श्वेता जैन यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आकर्षक रांगोळी काढून प्रवेशद्वार सजवले. आभार प्रदर्शन रयतचे लाईफ वर्कर आणि दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा यांचे संचालक प्रा. किशोर सुरेश पाटील यांनी केले. कार्यक्रमास विज्ञान विभाग प्रमुख झुंजार माने, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक महाविद्यालयात अकरावी वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. बुधवारी (दि. १५) अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या नवीन शैक्षणिक वर्षाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली.

नव्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात सकारात्मकतेने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या प्रवासाची उत्सुकता, नवीन मित्र, शिक्षक आणि शिक्षणाबद्दलचा उत्साह स्पष्टपणे दिसून येत होता. नवीन स्वप्ने, नवीन संधी आणि यशस्वी भविष्याची आशा मनात बाळगत अकरावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात केली. प्राचार्या निशा नायर आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती पूजन करून नवीन शैक्षणिक वर्षाची मुहूर्तमेढ रोवली.

# उरण महाविद्यालयात करिअर संसदेचा शपथविधी



**उरण : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील करिअर कट्टा विभागाच्या वतीने करिअर संसदेच्या विद्यार्थी पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक कौशल्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना करण्यात आली.

या करिअर संसदेत मुख्यमंत्री म्हणून खुशी रवींद्र बामणे, नियोजन मंत्री विशाल गौतम, कायदे व शिस्तपालन मंत्री विनय सुभाष राठोड, सामान्य प्रशासन मंत्री मीत सूर्यकांत पाटील, माहिती व प्रशासन मंत्री नीरज सुनील कनोजिया, उद्योजकता विकास मंत्री स्वानंद हनुमंत भोसले, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री इशा रामबाबू विमल, कौशल्य विकास मंत्री संध्या अंकुश जाधव, संसदीय कामकाज मंत्री प्राप्ती संतोष पांगुळ, महिला बालकल्याण मंत्री भूमी हरिश्चंद्र पाटील आणि सदस्य म्हणून जानवेश राजेंद्र शिंदे यांचा समावेश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी करिअर कट्टाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन स्वतःचे करिअर घडवावे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टाचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी केले. रजिस्टार म्हणून प्रा. व्ही.एस. इंदुलकर यांनी भूमिका पार पाडून आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

यावेळी डॉ. एम.जी. लोणे, डॉ. ए. आर. चव्हाण यांसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वर्षभर करिअर कट्टा व करिअर संसदेच्या माध्यमातून विविध रोजगाराभिमुख उपक्रम राबवले जाणार आहेत.

# कळंबोलीत तातडीने ईसीजी आणि एक्स-रे सुविधा द्या!

## नगरसेविका बायजा बारगजे यांची आग्रही मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली आरोग्य केंद्रात नागरिकांना तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी तेथे ईसीजी मशीन आणि फ्रॅक्चर निदानासाठी आवश्यक एक्स-रे मशीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेविका बायजा बबन बारगजे यांनी महापौरांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मंगळवारी (दि. १४) दिलेल्या निवेदनात बायजा बारगजे यांनी म्हटले आहे की, सध्या कळंबोली आरोग्य केंद्रात हृदयविकाराची तपासणी करण्यासाठी ईसीजी मशीन आणि फ्रॅक्चरचे निदान करण्यासाठी एक्स-रे मशीन उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी दूरच्या रुग्णालयात जावे लागत आहे. रुग्णांची गैरसोय यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीची सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

बायजा बारगजे यांनी पुढे मागणी केली की, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य केंद्रात ईसीजी मशीन आणि फ्रॅक्चर निदानासाठी आवश्यक एक्स-रे मशीन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावी.महापौरांनी या मागणीची सकारात्मक दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा त्यांनी निवेदनात व्यक्त केली आहे. यावेळी युवा नेते महेश बारगजे, शुभम गवस आणि साई चौगुले उपस्थित होते.

## संपादकीय

# जगासाठी आरोग्यदृष्टी

आयुर्वेद आणि योगाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या काही वर्षांत जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि आयुष मंत्रालय यांच्या सहकार्यामुळे आयुर्वेदासाठी जागतिक दर्जाची मानके विकसित करण्याचे काम सुरू आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे आयोजित 'सौश्रुतम् २०२६' या आंतरराष्ट्रीय परिसंवादात आयुर्वेदाच्या याच जागतिक प्रवासावर भर दिला.

**भारताकडे जगाला देण्यासारख्या अनेक मौल्यवान गोष्टी आहेत. भारताची हजारो वर्षांची वैद्यकीय परंपरा 'आयुर्वेद' ही त्यापैकीच एक महत्त्वाची देणगी मानली जाते. भारताची ही प्राचीन आरोग्यदृष्टी आज केवळ देशवासियांनाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीला अधिक निरोगी आणि संतुलित जीवनाचा मार्ग दाखवू शकते. आयुर्वेदाला पाठिंबा देणे हे 'व्होकल फॉर लोकल'चे उत्तम उदाहरण असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच सांगितले आहे. मानवाच्या शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधून निरोगी जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारी आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून एक संपूर्ण जीवनदृष्टी आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत वाढणारे ताणतणाव, आजार आणि मानसिक आरोग्याच्या समस्या पाहता आयुर्वेदाचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते आहे. मात्र समाजाच्या व्यापक हितासाठी आयुर्वेदामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक संशोधन, औषधांचे मानकीकरण, डिजिटल आरोग्य व्यवस्थेशी एकात्मिकरण आणि पुराव्यांवर आधारित अभ्यास यांच्या माध्यमातून आयुर्वेदाचा जागतिक स्वीकार अधिक दृढ होईल असा विश्वास राष्ट्रपतींनीही बुधवारी परिसंवादात व्यक्त केला. या ज्ञानपरंपरेचा अभिमान बाळगताना तिचे आधुनिक रूपांतर, संशोधन आणि जागतिक प्रसार यासाठीचे प्रयत्न अधिक वेगाने पुढे नेण्याची गरज आहे. प्राचीन ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधल्यास आयुर्वेद भविष्यातील जागतिक आरोग्य व्यवस्थेचा प्रभावी आधारस्तंभ ठरू शकतो. संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आयुर्वेद जागतिक आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनत चालला आहे. आता आयुर्वेदाचे सामर्थ्य केवळ भारतापुरते मर्यादित राहिलेले नाही. गेल्या काही वर्षांत भारताने आयुर्वेदाला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी व्यापक प्रयत्न केले आहेत. मोदी सरकारने संशोधन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांना चालना दिली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने पारंपरिक औषधांसाठी जागतिक केंद्र उभारण्याचा उपक्रम असो किंवा विविध देशांशी आयुर्वेदविषयक सामंजस्य करार, भारताने आपल्या पारंपरिक ज्ञानसंपदेचे जागतिकीकरण करण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत. आयुर्वेदाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ रोगांवर उपचार करण्यावर भर देत नाही तर रोग होऊच नयेत यासाठी जीवनशैलीत आवश्यक बदल सुचवतो. योग्य आहार, नियमित दिनचर्या, योग, ध्यान आणि नैसर्गिक उपचार यांद्वारे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढविणे आणि संपूर्ण आरोग्य जपणे हा आयुर्वेदाचा मूलभूत दृष्टिकोन आहे. त्यामुळेच आज जगभरात 'प्रिव्हेंटिव्ह हेल्थकेअर' आणि 'होलिस्टिक वेलनेस' या संकल्पनांना वाढते महत्त्व मिळत असताना आयुर्वेदाकडे नव्या आशेने पाहिले जात आहे. कोविड महामारीनंतर प्रतिकारशक्ती वाढविणे आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली याविषयी जागतिक पातळीवर जागरूकता वाढली आहे. या काळात आयुर्वेदाविषयीचा विश्वास आणि उत्सुकता दोन्ही वाढल्याचे दिसून आले आहे. अर्थात आयुर्वेदाचा प्रसार करताना वैज्ञानिक संशोधन, पुराव्यावर आधारित अभ्यास आणि गुणवत्तेची कठोर मानके यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. परंपरा आणि विज्ञान यांचा समन्वय साधूनच आयुर्वेदाला अधिक व्यापक स्वीकार मिळू शकतो.**

# शेतकरी कर्जमुक्ती आता अधिक व्यापक

शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करून शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे, याविषयी ही माहिती...

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना" हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करून शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत, मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे सहा लाख टन उत्पादन तीन हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**-विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# स्वातंत्र्यसेनानी अरुणा असफ अली

अरुणा असफ अली या थोर स्वातंत्र्यसेनानी होत्या. आज त्यांची जयंती... त्यांचा जन्म १६ जुलै १९०९ रोजी कालका, पंजाब, ब्रिटिश भारत (आता हरियाणा, भारत) येथे बंगाली ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील उपेंद्रनाथ गांगुली हे पूर्व बंगालमधील (आता बांगलादेश) बरिसाल जिल्ह्यातील होते, पण ते संयुक्त प्रांतात स्थायिक झाले होते. त्यांची आई अंबालिका देवी त्रैलोक्यनाथ सन्याल (एक प्रसिद्ध ब्राह्मो नेता) यांची कन्या होती. अरुणा यांची बहीण पूर्णिमा बॅनर्जी भारताच्या संविधान सभेच्या सदस्य होत्या.

अरुणा यांचे शिक्षण लाहोरमधील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट आणि नंतर नैनितालच्या ऑल सेंट्स कॉलेजमध्ये झाले. पदवीनंतर त्यांनी कलकत्ता (आताचे कोलकाता) येथील गोखले मेमोरियल स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून काम केले. दरम्यान त्यांची अलाहाबादमधील नेते असफ अली यांच्याशी भेट झाली. धर्म आणि वयाच्या कारणास्तव पालकांच्या विरोधाला न जुमानता १९२८मध्ये अरुणा यांनी असफ अली यांच्याशी लग्न केले.



अरुणा असफ अली यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठा वाटा होता. लग्नानंतर त्यांनी मीठ सत्याग्रहादरम्यान सार्वजनिक प्रक्रियेत भाग घेतला. त्यानंतर त्यांच्यावर काही चुकीचे आरोप लावून त्यांना अटक करण्यात आली होती. महात्मा गांधींनी मध्यस्थी केल्यानंतरच त्यांच्यासह इतर महिला कैद्यांची सुटका करण्यात आली.

१९३२मध्ये अरुणा यांना परत अटक करण्यात आली, तेव्हा त्यांना, तिहार तुरुंगात कैदी म्हणून ठेवण्यात आले होते. यावेळी त्यांनी उपोषण सुरू करून राजकीय कैद्यांच्या उदासीन वागणुकीचा निषेध केला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे तिहार तुरुंगातील परिस्थिती सुधारली, मात्र या गोष्टीचा बदला म्हणून त्यांना अंबाला येथे हलवण्यात आले आणि एकांतवासात ठेवण्यात आले. अंबाला येथुन झालेल्या सुटकेनंतर त्या राजकीयदृष्ट्या फारशा सक्रिय नव्हत्या, परंतु १९४२च्या शेवटी त्यांनी भूमिगत चळवळीत भाग घेतला. दरम्यान, त्यांनी राम मनोहर लोहिया यांच्यासोबत मासिक इन्कलाबचे संपादनही केले. पुढे त्यांनी आणि देशभक्त नारायणन यांनी लिंक पब्लिशिंग हाऊस सुरू केले आणि त्याच वर्षी त्यांनी देशभक्त हे दैनिक आणि साप्ताहिक लिंक प्रकाशित केले. २९ जुलै १९९६ रोजी नवी दिल्ली येथे ८७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# ...तोवर व्हॉट्सअॅप युजरनेम फीचरसाठी भारतात प्रतीक्षा

व्हॉट्सअॅपचे युजरनेम फीचर सध्या भारतात सुरू होणार नसल्याचे मेटा कंपनीने जाहीर केले आहे. जोपर्यंत भारत सरकारसोबतची चर्चा पूर्ण होत नाही आणि सगळ्या प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक होत नाहीत, तोपर्यंत हे युजरनेम फीचर्स रोलआऊट केले जाणार नसल्याचे व्हॉट्सअॅपची पेरेंट कंपनी मेटाने म्हटले आहे.





मोबाईल नंबर शेअर न करता चॅट करण्याच्या फीचरची वाट पाहणाऱ्या युझर्सना अजून थोडा वेळ थांबावे लागेल. व्हॉट्सअॅपने नुकतेच युझरनेम फीचर जाहीर केले होते, ज्यामुळे वापरकर्त्यांना त्यांच्या मोबाईल नंबरऐवजी एका अनोख्या युझरनेमचा वापर करून इतरांशी संवाद साधता येणार होता. प्रायव्हसीला अधिक महत्त्व देण्यासाठी या फीचरचा उपयोग होणार होता. या फिरचरमुळे प्रत्येक वेळी तुम्ही एखाद्या नवीन व्यक्तीशी चॅट सुरू करता तेव्हा तुम्हाला तुमचा फोन नंबर शेअर करावा लागणार नव्हता. टेलिग्राम आणि सिग्नलसारख्या प्लॅटफॉर्मवर हे वैशिष्ट्य आधीपासूनच उपलब्ध आहे.

भारतीय सरकारने या वैशिष्ट्याबाबत चिंता व्यक्त केली असून पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्यास त्याचा गैरवापर होऊ शकतो, असे म्हटले आहे. बनावट युझरनेम तयार करून ऑनलाइन फसवणूक, फिशिंग आणि डिजिटल अटक यांसारख्या सायबर गुन्ह्यांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटाला नोटीस बजावून, या फीचरची अंमलबजावणी थांबवण्यास आणि सविस्तर उत्तर देण्यास सांगितले आहे.

मेटानेदेखील याबाबतीत महत्त्वाचा निर्णय घेत, दोन्ही पक्षांमधील वाटाघाटी पूर्ण होईपर्यंत हे फीचर भारतात सुरू केले जाणार नसल्याचे म्हटले आहे. कंपनीने असेही म्हटले की, व्हॉट्सअॅप खाते तयार करण्यासाठी मोबाईल नंबरची अट पूर्वीप्रमाणेच राहील. भारत सरकार सध्या मेटाच्या प्रतिसादाचे आणि सुरक्षा उपायांचे पुनरावलोकन करत आहे. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत भारतात व्हॉट्सअॅप युझरनेम फीचर उपलब्ध होणार नाही. केवळ व्हॉट्सअॅपवरच नव्हे, तर टेलिग्राम आणि सिग्नलसारख्या इतर मेसेजिंग प्लॅटफॉर्मवरही अशाच प्रकारची वैशिष्ट्ये आणण्याचा विचार करत आहे, पण परवानगी आवश्यक आहे.

# मराठी साहित्यिक वा.कृ. चोरघडे

प्रसिद्ध मराठी कथाकार वामन कृष्ण चोरघरे उर्फ वा.कृ. चोरघडे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील नारखेड या गावी १६ जुलै १९१४ रोजी झाला. त्यांचे शिक्षण नागपूर येथेच झाले असून मराठी व अर्थशास्त्र हे दोन विषय घेऊन एम.ए. आणि बी.टी. या पदव्या मिळविल्यावर त्यांनी १९४९पर्यंत वर्धा येथील महाविद्यालयात अध्यापन केले. त्यानंतर काही काळ नागपूर येथील 'जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स' येथे उपप्राचार्य म्हणून काम केले. त्यानंतर 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'चे संचालक. नागपूर विद्यापीठात १९४६ ते ७०पर्यंत विद्यासभा, कार्यकारिणी आदी वीस समित्यांवर त्यांनी काम केले आहे. गांधीवादाचा त्यांच्या विचारावर प्रभाव असून १९४२ च्या आंदोलनात त्यांनी तुरुंगवासही भोगला.



## निमित्त

१९३२मध्ये 'अम्मा' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर पारिजात, प्रतिभा, सत्यकथा, ज्योत्स्ना, कला इ. विविध वृत्तींच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांनी प्रामुख्याने कथालेखन केले. सुषमा (१९३६) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर हवन (१९३८), यौवन (१९४१), प्रस्थान (१९४५), पाथेय (१९४६), संस्कार (१९५०), प्रदीप (१९५४), ओंजळ (१९५७), मजल (१९६३), बेला (१९६४), ख्याल (१९७३) इ. त्यांचे अन्य कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

चोरघडे स्वतःस जीवनाचे उपासक समजतात, तथापि 'कलेसाठी कला' या भूमिकेचा त्यांनी पुरस्कार केला आहे. आत्मप्रकटीकरणासाठी कथा हेच माध्यम त्यांना आवडते. चोरघडे हे फडके-खांडेकर युगातील कथा आणि नवकथा यांतील एक मोलाचा आणि महत्त्वाचा दुवा होत.


काव्यात्म वृत्तीने लिहिलेली चोरघडे यांची कथा फडके-खांडेकर युगातील कथेला सांकेतिकतेच्या बंधनातून मुक्त करू शकली. जे भोगले तेच त्यांच्या कथेतून अवतरले. त्यांची कथा म्हणजे भावस्थितीचे क्षणचित्र होय. 'विहीर', 'घार', 'काचेची किमया', 'अतिथी देवो भव', 'संस्कार' इ. कथांतून स्वतःचे असे वेगळे विश्व त्यांनी उभे केले सामर्थ्य आहे. नव्या शैलीच्या त्यांच्या कथांत वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आहे.

काळ बदलला आहे हा वा.कृ. चोरघडे यांच्या संकीर्ण लेखांचा संग्रह असून काका कालेलकर, साने गुरुजी, नरकेसरी अभ्यंकर यांची चरित्रेही त्यांनी लिहिली आहेत. माधव सावंत यांच्या सहकार्याने त्यांनी एक मराठी-हिंदुस्तानी कोश संपादित केला आहे. त्यांच्या आजवरच्या स्वतंत्र, अनुवादित-संपादित ग्रंथांची संख्या ७४ इतकी आहे.

वा.कृ. चोरघडे यांच्या प्रदीप आणि पाथेय या कथासंग्रहांना मध्य प्रदेश शासन साहित्यपरिषदेचे पारितोषिक मिळाले चोरघडे यांची कथा या संग्रहास महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले संपूर्ण चोरघडे या संग्रहास प्रवासी वंग साहित्य संमेलनात 'युगांतर' पारितोषिक मिळाले. याच ग्रंथास नागपूर विद्यापीठानेही सुवर्णपदक देऊन गौरविले.

(साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# घसा सारखा खवखवतो? हे उपाय करा...

घसा खराब होणे, सोलवटल्यासारखे वाटणे आणि खाताना त्रास होणे हे अनेकदा बदलत्या हवामानामुळे, गरम-थंड पदार्थ एकत्र खाल्ल्यामुळे किंवा संसर्गामुळे होते. अशा वेळी घसा जळजळतो, खवखवतो आणि बोलताना किंवा खाता-पिताना प्रचंड वेदना होतात. सुरुवातीला ही समस्या सामान्य वाटते, पण दुर्लक्ष केल्यास ती वाढू शकते आणि औषधांची गरज लागू शकते. त्यामुळे सुरुवातीपासूनच योग्य घरगुती उपाय करायचे. त्यामुळे त्रास कमी होतो आणि आराम मिळतो तसेच पुढे दवाखान्याच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत.



घसा दुखत असेल, सोलवटलेला वाटत असेल तर सर्वात आधी गरम पाण्याच्या गुळण्या करणे हा उपाय आपण सारेच करतो. एका ग्लास कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ टाकून दिवसातून दोन ते तीन वेळा गुळण्या केल्याने घशाची सूज कमी होते. तेथील जंतू नष्ट होतात. हळद आणि दूध हे त्रासावर रामबाण औषध मानले जाते. रात्री झोपण्यापूर्वी गरम दुधात अर्धा चमचा हळद टाकून ते दूध प्यायचे. हळदीतील अँटीसेप्टिक गुणधर्म घशातली जळजळ शांत करतात आणि झोपही लागते.

तुळस आणि आल्याचा काढा तयार करून प्यायल्यास घशाला खूप आराम मिळतो. या काढ्यासाठी पाण्यात तुळशीची पाने, आल्याचा तुकडा, थोडी काळीमिरी आणि गवती चहा घालून उकळायचे. हा काढा दिवसातून एक किंवा दोन वेळा घेतल्यास घशाची सूज कमी होते. आल्याचा रस आणि मध यांचं मिश्रण घेतल्यासही घसा मोकळा होतो. एक चमचा मधात थोडा आल्याचा रस घालून ते थोडं थोडं करून चाटा. त्यामुळे घशाचा कोरडेपणा राहत नाही आणि सततचा त्रास कमी होतो.

वाफ घेणे हाही एक उत्तम उपाय आहे. गरम पाण्यात थोडं मिंट ऑईल किंवा ओवा टाकून घेतलेली वाफ घशातील बंद जागा मोकळ्या करते. वाफ घेतल्याने सर्दी, खवखव दूर होण्यास मदत होते. खूप थंड पदार्थ, बर्फाचे पाणी किंवा आइसक्रीम टाळाणे महत्वाचे आहे. तसेच उष्ण गरमागरम आहार घ्यावा. गरम सूप, मूगडाळीचे वरण, खिचडी असे पदार्थ खायचे. घशाला आराम मिळतो आणि पचनासाठीही ते सोपे असतात.

घसा दुखणं सामान्य असलं तरी काही वेळा ही लक्षणे तीन-चार दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत असल्यास किंवा ताप, अन्न-पाणी घेता न येणं, सततचा त्रास जाणवायला लागल्यावर तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते.

# पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी झाडे लावा, झाडे जगवा -आ. रविशेठ पाटील

## एसटीच्या रामवाडी विभागीय कार्यालयासमोर वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**

पर्यावरणाच्या दृष्टीने लोकांच्या आरोग्यासाठी प्राणवायू मिळण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज आहे. एसटी विभागाने हा सुंदर उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी झाडे लावा, झाडे जगवा, असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश आमदार रविवशेठ पाटील यांनी रामवाडी एसटी विभागीय कार्यालय परिसरात करण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना दिला.



परिवहनमंत्री प्रताप सरनाईक व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मार्गदर्शनाखाली राज्यात वृक्षारोपण मोहीम सुरू असून त्या अनुषंगाने एसटीच्या रामवाडी विभागीय कार्यालय येथे आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संदीप पाटील, सुहास कांबळे, अपर्णा वर्तक, रोहिदास कांबळे, मनीषा पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

"झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी वृक्षारोपण करून नागरिकांना प्रत्येकाने किमान एकतरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि घटणारे हरित क्षेत्र लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध प्रकारची रोपे लावण्यात आली. उपस्थित मान्यवर, एसटी कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. पर्यावरण संवर्धनासाठी लोकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# कडाव येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलिसांनी कडाव येथे अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून 'तीन पत्ती' हा जुगार खेळणाऱ्या सात जणां विरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ६ हजार ४०० रुपयांची रोख रक्कम आणि ५२ पत्त्यांचा संच जप्त करण्यात आला.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण नवले, सहाय्यक फौजदार राजेंद्र दुसाणे, पोलीस हवालदार समीर भोईर, महिला पोलीस शिपाई प्राची शेळके आणि पोलीस शिपाई संग्राम कांबळे यांच्या पथकाने पंचां समक्ष कडाव येथे छापा टाकला. फुलाजी हनुमंत पवार यांच्या घराच्या पडवीत सात जण पैशांवर जुगार खेळताना आढळून आले.

याप्रकरणी कडाव येथील फुलाजी हनुमंत पवार, राम श्रीकृष्ण दुगड, प्रमोद हरिश्चंद्र गंगावणे, बाळू झावरु म्हसे तसेच टाकवे येथील विजय शिवाजी काळोखे, अनिल झिपरु काळोखे आणि सापेले येथील मारुती गोपाळ जगताप यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे अवैधरित्या तिन पत्ती या नावाचा जुगार खेळतांना मिळुन आले, त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जुगार बंदी अधिनीयम १८८७ कलम १२ अ प्रमाणे सरकारतर्फे खबर आहे. सोबत जप्त मुद्देमाल व पंचनामा करण्यात आला असून कारवाईनंतर आरोपींना नोटीस देऊन सोडण्यात आले आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार राजेंद्र दुसाणे करीत आहेत.

राम प्रहर | नियमित वाचा!

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय पनवेल**
जुना ठाना नाका साई नगर, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६
दुरध्वनी क्र.: / फॅक्स क्र.: ०२२-२७४५२३९९,
ई-मेलः-tahasilpanvel@gmail.com

कि.चौ. अर्ज ०२/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**"नोटीस"**

**विषयः- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार यांचा दि. १२/०१/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री प्रसाद माधव चोरघे, रा.५२ बंगलो, मु.पो. पळस्पे, मुंबई गोवा रोड, जयवंत हॉटेल समोर, पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी स्वताः ची उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल, जि. रायगड यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

तथापी, उक्त प्रकरणी सदर जन्म नोंदीस आपली कोणतीही हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाचे आत सादर करावी. जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसा नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(राजश्री जोगी)
निवासी तहसिलदार पनवेल तथा,
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

# वावे येथे नवीन अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वावे येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारतीचा लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि. १४) उत्साहात संपन्न झाला. अलिबाग पंचायत समितीच्या बेलोशी गणाचे सदस्य तथा शिवसेना ज्येष्ठ नेते संतोष निगडे यांच्या पाठपुराव्यामुळे ही अंगणवाडी इमारत जिल्हा नियोजन निधीतून साकारण्यात आली आहे.



वावे ग्रामस्थांच्या वतीने आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संतोष निगडे उपस्थित होते. ग्रामस्थांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. गावातील ज्येष्ठ महिलांच्या हस्ते पूजाअर्चा करण्यात आली. जनार्दन तुरे, दिनेश राऊत, हरिश्चंद्र गावंड, देविदास राऊत आणि संतोष निगडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. संतोष निगडे व जनार्दन तुरे यांच्या हस्ते फीत कापून नवीन अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

अंगणवाडी परिसरात स्वागत व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. वावे ग्रामस्थांच्या वतीने संतोष निगडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दिनेश राऊत व जनार्दन तुरे यांनी मनोगत व्यक्त करताना गावातील अनेक विकासकामे मार्गी लावली असून त्यांच्या प्रयत्नांतून अंगणवाडीची नवीन इमारत साकार झाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

संतोष निगडे यांनी उपस्थित ग्रामस्थांचे आभार मानत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री. दिलीप कृष्णा पाटील , पत्ता : रा. पेंधर, पो. नावडे, ता. पनवेल जि. रायगड ४१० २०६ माझेकडून कळंबोली येथे प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी तळोजा पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०६२३/२०२६ दिनांक. १४/०७/२०२६ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. १० वीची मार्कशिट सन १९९६
२. १२ ची मार्कशिट सन २०१७
३. १२ वी चा शाळा सोडण्याचा दाखला

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८३५५९००१४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**दिनांक :- १५/०७/२०२६**

**सही/-**
**दिलीप कृष्णा पाटील**
**पेंधर , नावडे- पनवेल**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
जुना ठाणा नाका साई नगर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

कि.चौ. अर्ज ०५/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**"नोटीस"**

**विषयः- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार यांचा दि. ०६/०५/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री वासुदेव हरिदास दापोलकर, रा. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड यांनी स्वताः ची उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल, जि. रायगड यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

तथापी, उक्त प्रकरणी सदर जन्म नोंदीस आपली कोणतीही हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाचे आत सादर करावी. जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसा नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(राजश्री जोगी)
निवासी तहसिलदार पनवेल तथा,
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

# ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या संवेदनशीलतेने नवजात बाळाला मिळाले वेळीच उपचार

**चौक : प्रतिनिधी**

आजही माणुसकी शिल्लक असल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांच्यामुळे एका नवजात बाळाला आरोग्य सेवा मिळाली. त्यामुळे नवजात बाळ सुखरूप आपल्या घरी आले.



ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीचे ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम शासकीय कामानिमित्त पनवेलकडे जाताना जुना मुंबई पुणे रस्त्यावर वावंढळ बस स्थानकावर एक महिला छोट्या मुलाला घेऊन उभी होती. तिचे बाळ रडत होते. पाऊस पडत असताना हे दृश्य दिसत होते. ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांची गाडी पुढे गेली, मनात आणि डोळ्यांसमोर ते चित्र असल्याने त्यांनी गाडी मागे घेतली आणि त्या महिलेची चौकशी केली असता तिने तिच्या नवऱ्याला फोन करण्यास सांगितले. अधिक माहिती घेतली असता हे बाळ चार तास रडत असल्याचे तिने सांगितले. ते आजारी होते. प्रशांत कदम यांनी महिला व तिच्या बाळाला गाडीत घेतले आणि चौक दवाखाना गाठला. त्यांनी डॉक्टरांना मुलाची तपासणी करण्यास सांगितले. बाळाची तपासणी झाल्यावर निदान झाले. औषधोपचार झाल्यावर बाळाने रडणे थांबवले. आई आणि बाळ भिजून चिंब झाले होते. मुलावर औषधोपचार करून पुन्हा त्यांना त्यांच्या घरी सुखरूप सोडले.

(जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक, निविदा-०४१७/(प्र.क्र. २४७/ १७) मोप्र-१/ दि-१८/१०/२०२३)

**निविदा सूचना**
महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली,ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय
ई मेल पत्ता:- eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com, दूरध्वनी-०२१४३-२७८०११

**ई निविदा सूचना क्र. ०३ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली,ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अनुभवी व सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, उत्तर कोकण पाटबंधारे विभाग, कळवा ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | इसारा रक्कम | काम पुर्ण करावयाचा कालावधी | निविदा संचाची किंमत | कंत्राटदारा चा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेटवणे प्रकल्पाच्या पुच्छ कालव्याच्या उजव्या बाजूस सा.क्र.६९० ते सा.क्र. ७६० येथे मार्गदर्शक भिंत बांधणे | रु २,१३,५१,१८७/- | रु १,५०,०००/- | ०६ महिने (पावसाळ्या-सह) | रु. २,०००/- + ३६०/- (१८% GST) एकुण रु. २,३६०/- | संदर्भित कामातील अनुभवी व सक्षम कंत्राटदार |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| अ.क्र | | सुरुवात दिनांक | सुरुवात वेळ | समाप्ती दिनांक | समाप्ती वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्रि आणि डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.१६.०७.२०२६ | ११.०० | दि. २३.०७.२०२६ | १८.०० |
| २ | बिड सबमिशन करण्याचा कालावधी | दि.१६.०७.२०२६ | ११.०० | दि. २३.०७.२०२६ | १८.०० |
| ३ | तांत्रिक लखोटा उघडण्याचा दिनांक व स्थान | दि २४.०७.२०२६ | १८.०० | कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली ता.पेण जि.रायगड | |

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.
३) जर कंत्राटदारांना निविदेबाबत काही शंका असतील तर त्यांनी पोर्टलमध्यम दिलेल्या Seek Clarification पर्यायाद्वारे संपर्क साधावा. निविदेबाबत कोणतीही शंका उपस्थित करण्याची शेवटची तारीख २०.०७.२०२६ सायं. ६.०० वाजेपर्यंत अशी असेल

**जा.क्र.हेमप्रवि/लेशा-१/ई-निविदा/१५६०/२०२६**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता.पेण, जि. रायगड,**
**दिनांक :- १३/०७/२०२६**

**सही/-**
**(दि.का. राजभोज)**
**कार्यकारी अभियंता,**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,**
**कामार्ली ता. पेण जि.रायगड**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकारक वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ मृत्यू १७१८/२०२६ — दिनांक : १९/०६/२०२६

**"नोटीस"**

**विषयः- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार श्री. गणेश परशुराम पाठे, यांचा दि. १३/०५/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. गणेश परशुराम पाठे, रा.हाऊस नं.१२४, मु. कोळवाडी, पो.पडघे, वळक मार्ग, साई मंदिर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांची आजी कै. पार्वती हाल्या पाठे यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १७/७/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(सारंग राठोड)
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

# गणित संबोध परीक्षेत तळा मराठी शाळा अव्वल

**तळा :** तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा तळा मराठी शाळा रायगड गणित, विज्ञान अध्यापक मंडळ आयोजीत परीक्षेत अव्वल ठरली आहे.

रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित ५वी गणित संबोध परीक्षा २०२५-२६ घेण्यात आली होती. १२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पैकी ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गणित विषयाचा शाळेचा निकाल ९१.६६ टक्के लागला. आरुषी बोडखे ६८ टक्के गुण मिळवून प्रथम तर प्रार्थना ठमके ६२ टक्के गुण मिळवून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.



# वदप येथील जिल्हा परिषद शाळेतील १५९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वदप येथे असलेल्या रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड यांच्या हस्ते १५९ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आणि अन्य साहित्य भेट देण्यात आले.



कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वदप येथे टोरेंट एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड तर्फे शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, तसेच ग्रुप ग्रामपंचायत सरपंच राखी पाटील, माजी उपसरपंच काशिनाथ उघडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील पवार तसेच सदस्य रमेश मुकणे, रमाबाई वाघमारे, जयेश खरात, मोहिनी रोकडे, सुप्रिया ओगले मनीषा मोरे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी १५९ विद्यार्थ्यांना शाळेत स्कूल किड्स चे वाटप करण्यात आले.या शाळेत प्रामुख्याने आदिवासी कातकरी समाजाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेता यावे त्याचबरोबर त्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावावा तसेच त्यांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन शिकण्याची पूरक शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध व्हावे. ती उद्देशाने टोरंट कंपनीकडून सामाजिक जाणवेतून हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शाळेतील १५९ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स, पाण्याची बाटली तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७ - फॅक्स नं - ०२१९४-२३४०७८
Email : rohanagarpalika@gmail.com

**निविदा सुचना**

रोहा अष्टमी नगर परिषद, रोहा नगर परिषद यांस कडून योग्य त्या वर्गात नोंदणीकृत (विद्युत कामांकरिता) अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून १) रोहा अष्टमी नगर परिषदेच्या डेलवहाळ पंप हाऊस येथे APFC पॅनेल बसविणे व कार्यान्वित करून देणे (द्विवतीय प्रसिध्दी) २) रोहा अष्टमी नगर परिषदेच्या डोलवहाळ पंप हाऊस येथील आवश्यक ती विद्युत दुरूस्ती करणे व कार्यान्ववित करू देणे ३) रोहा अष्टमी नगर परिषद कार्यक्षेत्रातील नादुरूस्त हायमास्ट दिवे दुरूस्ती करणे व कार्यान्वित करून देणे कामाचे निविदा दरपत्रक मागविणेत येत आहे. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने होईल. निविदा नोटीस, प्रसिध्दी, सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दपत्रक इत्यादी माहीती नगर परिषद कार्यालयातील विद्युत/पाणीपुरवठा विभागात दिनांक १६-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून २४-०७-२०२६ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल.

क्र. रोनप/पापु/विद्युत/ नि.सु./ वि.दु/११८७/२०२६
दिनांक- १५/०७/२०२६

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
नगराध्यक्ष
रोहा अष्टमी नगर परिषद

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकारक वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ जन्म १७१९/२०२६ — दिनांक : १९/०६/२०२६

**"नोटीस"**

**विषयः- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार श्री. बाळाराम पांडूरंग पाठे, यांचा दि. १३/०५/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री.बाळाराम पांडुरंग पाठे, रा. हाऊस नं.१२४, मु. कोळवाडी, पो. पडघे, वळक मार्ग, साई मंदिर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांची आजी कै. हासुबाई दुनकर पाठे यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १७/७/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(सारंग राठोड)
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

# स्वच्छता सैनिकांच्या सन्मानार्थ नवी मुंबईत 'नमस्ते दिवस'

**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील सुपर स्वच्छ लीगमध्ये नवी मुंबईला मिळालेल्या मानांकनाचे श्रेय स्वच्छताकर्मींच्या अथक परिश्रमाला आहे. त्यांच्या सेवाभावी कामाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'नमस्ते दिवस' हे उत्तम माध्यम आहे, असे प्रतिपादन महापौर सुजाता पाटील यांनी केले. स्वच्छताकर्मींना दिले जाणारे पीपीई कीट म्हणजे त्यांचे जीवन आमच्यासाठी किती महत्त्वाचे आहे, ही भावना असल्याचेही त्या म्हणाल्या. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात 'नमस्ते दिवस'निमित्त पीपीई कीट वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.



यावेळी बोलताना महापौर सुजाता पाटील यांनी स्वच्छताकर्मींना शहराच्या आरोग्याची सुरक्षा जपणारे 'स्वच्छता सैनिक' म्हणून संबोधत त्यांच्या कार्याचे अभिवादन केले. उपमहापौर दशरथ भगत यांनी 'नमस्ते दिवस' हा स्वच्छताकर्मींचा सन्मानदिन असल्याचे सांगितले. आपले स्वच्छता कर्मचारी नंबर वन असून ते शहराची काळजी घेतातच, पण आकस्मिक गरज भासल्यास इतर शहरांमध्येही मदतकार्यासाठी धावून जातात, याचा अभिमान असल्याचे ते म्हणाले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छतेतून शहराचे आरोग्य जपणारे स्वच्छतामित्र आणि सफाईमित्र आपत्कालीन स्थितीत युद्धपातळीवर काम करतात. गरजेच्या वेळी इतर शहरांमध्ये जाऊन सेवा देणे ही प्रशंसनीय बाब आहे. नवी मुंबईच्या कार्यसंस्कृतीचे कौतुक होण्याचे कारणही हेच आहे, असे सांगत यापुढे यांत्रिकी स्वच्छता अधिक सक्षम करण्याचा मनोदय व्यक्त केला.

कार्यक्रमाला उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ. अजय गडदे, अतिरिक्त शहर अभियंता मदन वाघचौडे, परिवहन व्यवस्थापक उमाकांत जंगले, कार्यकारी अभियंता दीपक सूर्यराव, उपअभियंता स्वप्निल देसाई, मुख्य स्वच्छता अधिकारी राजूसिंह चव्हाण, कनिष्ठ अभियंता दिलीप बेनके, वैभव देशमुख, स्वच्छता निरीक्षक किरण सोळस्कर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मलनि:स्सारण विभागातील १० सफाईमित्र व स्त्रीमुक्ती संघटनेच्या १० परिसर सखींना महापौर आणि मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात सुरक्षा साधनांचे पीपीई कीट वितरित करण्यात आले. महापालिकेच्या २६ नागरी आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छतामित्र आणि स्वच्छता सखींसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# प्रकल्पग्रस्त, सिडको घरे फ्री होल्ड करा!

**आमदार मंदा म्हात्रे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे आणि सिडकोच्या अखत्यारीतील लीज होल्ड इमारती तातडीने फ्री होल्ड कराव्यात, अशी आग्रही मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदनही सादर केले.



नवी मुंबई शहर वसवताना स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या १०० टक्के जमिनी संपादित करण्यात आल्या. त्यामुळे गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायमस्वरूपी दर्जा देण्याची मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी विधिमंडळाच्या सभागृहात लक्षवेधीद्वारे सातत्याने मांडली होती. सन २०१८मध्ये राज्य शासनाने प्रकल्पग्रस्तांची घरे आणि सिडकोच्या इमारती फ्री होल्ड करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र आवश्यक प्रक्रिया पूर्ण होऊनही अद्याप शासन निर्णय जारी झालेला नाही, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

नवी मुंबईतील हजारो प्रकल्पग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिक लीज होल्ड धोरणामुळे अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण, कर्जप्रकरणे आणि वारसाहक्क यांसारख्या बाबींमध्ये नागरिकांना प्रशासकीय अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे आमदार म्हात्रे यांनी अधोरेखित केले. प्रकल्पग्रस्तांची घरे आणि सिडकोच्या इमारती फ्री होल्ड झाल्यास नागरिकांना त्यांच्या मालमत्तेवर पूर्ण मालकी हक्क मिळेल. विशिष्ट दर भरून सदनिकाधारकांना मालकी हक्क मिळाल्याने व्यवहार सुलभ होतील, विकासाला गती मिळेल आणि नागरिकांची दीर्घकाळापासूनची मागणी पूर्ण होईल, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

त्यामुळे नागरिकांच्या हिताचा विचार करून राज्य शासनाने तातडीने शासन निर्णय काढून फ्री होल्ड धोरणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# नेरूळ येथील उद्यानातील घसरगुंडीच्या दुरूस्तीची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर-६ येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील घसरगुंडी तुटलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे उद्यानात खेळण्यासाठी येणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. घसरगुंडी तुटलेली असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली असून पालक आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या उद्यानात दररोज मोठ्या संख्येने मुले खेळण्यासाठी येतात, मात्र तुटलेल्या घसरगुंडीमुळे मुलांना खेळता येत नसून त्यांच्यात निराशा आहे. ही धोकादायक स्थिती कायम राहिल्यास कोणतीही दुर्घटना घडू शकते, अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

यासंदर्भात शिवसैनिक महादेव माणिकराव पवार (शिंदे गट) यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. त्यात तुटलेल्या घसरगुंडीची तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. सोबतच उद्यानातील सर्व खेळ साहित्याची पाहणी करून आवश्यक त्या दुरुस्त्या त्वरित करण्यात याव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

# धोकादायक शस्त्राने मारहाण करणाऱ्यास कारावास

**उरण : प्रतिनिधी**

धोकादायक शस्त्राचा वापर करून जाणूनबुजून इजा करण्याच्या गुन्ह्यातील आरोपीला अखेर न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. उरण पोलीस ठाण्याच्या तपास यंत्रणेने हा खटला यशस्वीपणे लढवून गुन्हेगाराला शिक्षा ठोठावली आहे. उरणचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस.पी. वानखेडे यांच्या न्यायालय क्र.१ मध्ये सुरू असलेल्या नियमित फौजदारी खटल्याचा निकाल १० जुलैला लागला. आरोपी बाळकृष्ण लाडग्या म्हात्रेवर धोकादायक शस्त्राचा वापर करून फिर्यादीला गंभीर इजा केल्याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवून भादंवि कलम ३२४ अंतर्गत साधा कारावास, ५,००० रुपये दंड तसेच दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावास व भादंवि कलम ५०४ अंतर्गत तीन महिने साधा कारावास व १,००० रुपये दंडाची शिक्षाही सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून वृक्षारोपण

**हनुमान गडावर रोपांची लागवड**

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रभूषण पद्मश्री डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने नवी मुंबईत वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ निरूपणकार आणि थोर समाजसुधारक महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून महापे येथील श्री हनुमान गड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



या उपक्रमात एकूण २७४ विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व लक्षात घेऊन श्री सदस्यांनी मोठ्या उत्साहाने या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवला. वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. "देशाने मला काय दिले यापेक्षा मी देशाला काय देऊ शकतो, याचा विचार करा," हा डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचा विचारमंत्र आचरणात आणत श्री सदस्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

या वृक्षारोपण कार्यक्रमाला महाराष्ट्र वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण, हरित नवी मुंबई आणि भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत पर्यावरण निर्मितीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक, पर्यावरणीय आणि जनहिताचे विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. वृक्षारोपणासारख्या उपक्रमांमधून समाजात पर्यावरणाबाबत जनजागृती करण्याचे कार्य सुरू आहे.

# उरण एसटी डेपो परिसरात १०० रोपांची लागवड



**उरण : बातमीदार**

वृक्षावर प्रेम करणे म्हणजे आपल्या आईवर प्रेम करण्यासारखेच आहे. तरी ते प्रेम वृक्ष लावून करूया, असा विचार कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी व्यक्त केला. उरण एसटी डेपो येथे झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत डेपो परिसरात १०० झाडे लावण्याचा उपक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद डेपो व्यवस्थापक बेंद्रे यांनी भूषविले. यावेळी जेएनपीएचे माजी वित्त अधिकारी महादेव घरत म्हणाले की, वृक्षारोपण ही समाजाने समाजासाठी करायची सेवा आहे. अशा उपक्रमासाठी निमंत्रित केल्याबद्दल त्यांनी डेपो व्यवस्थापकांचे आभार मानले. अध्यक्षीय भाषणात डेपो व्यवस्थापक बेंद्रे यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांच्या उत्साही सहभागामुळेच असे कार्यक्रम यशस्वी होत आहेत. कार्यक्रमाला समाजसेविका अनुताई पाटील, सायली पाटील, तानाजी भोईर, संजय पाटील आणि एसटी डेपो कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.

# दिवाळे कोळीवाड्यात सागरी सुरक्षा जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

सागरी सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आणि समुद्रातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने पुढाकार घेतला आहे. एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणे आणि सागरी सुरक्षा शाखेच्या वतीने भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाच्या संयुक्त विद्यमाने दिवाळे कोळीवाडा येथील स्वाध्याय परिवार समाज मंदिर हॉलमध्ये मच्छीमार बांधवांसाठी "संवाद व प्रबोधन मेळावा - व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम २०२६" उत्साहात पार पडला.



मेळाव्यात भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मच्छीमार बांधवांशी थेट संवाद साधला. यावेळी सुरक्षित मासेमारी, समुद्रातील आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी, सीमावर्ती भागातील सतर्कता आणि संशयास्पद हालचालींची माहिती तत्काळ सुरक्षा यंत्रणांना देण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या विविध सागरी सुरक्षा उपाययोजनांचीही माहिती देण्यात आली. मच्छीमार बांधवांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अधिकाऱ्यांनी उत्तरे दिली. सुरक्षा यंत्रणा आणि मच्छीमार यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

सागरी सुरक्षेसाठी प्रत्येक मच्छीमार हा महत्त्वाचा दुवा असून त्यांची सतर्कता देशाच्या किनारपट्टीच्या सुरक्षेसाठी मोलाची असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमात जीवरक्षक महेश सुतार, सुरज भोईर, अमर भोईर आणि नवनाथ सुतार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या जनजागृतीपर उपक्रमाला परिसरातील सागर रक्षक दलाचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, डोलकर मच्छीमार संस्था, फगवाले मच्छीमार संस्था, खांदेवाले मच्छीमार संस्था, अजिंक्य सामाजिक संस्था यांच्यासह स्थानिक कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय तटरक्षक दलाच्या वतीने सागरी सुरक्षेसाठी अधिकृत आपत्कालीन हेल्पलाइन ०२२-२२६६४१७४ आणि जेएनपीटीचा चॅनल क्रमांक ६० हा दूरध्वनी क्रमांक यावेळी जाहीर करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एन.आर.आय. सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील वाघमारे, सागरी सुरक्षा शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष काणे, गणेश शिंदे, भारतीय नौदलाचे अधिकारी मयूर बोरगावकर, भारतीय तटरक्षक दलाचे अधिकारी गौरव कुमार, अक्षय कुछट, भूपेंद्र कुमार, पालघर मच्छीमार सोसायटीचे पवन काळे आणि जेएनपीटीचे स्वप्नील ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी मच्छीमार बांधवांना सागरी सुरक्षेबाबत सदैव जागरूक राहण्याचे आवाहन केले.

# शिरावणे गावातील रस्ता झाला मोकळा!

## कोसळलेली फांदी प्रशासनाने हटवली

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रभाग क्रमांक २२ मधील शिरावणे गावातील मुख्य रस्त्यावर एका मोठ्या झाडाची फांदी अचानक कोसळल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या मागणीनंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करत ही फांदी हटवली आहे.

स्थानिक भाजप नगरसेविका माधुरी सुतार यांनी याची दखल घेत संबंधित विभागाच्या पथकाला घटनास्थळी पाचारण केले. प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप केल्याने मोठा अपघात टळला. झाडाची मोठी फांदी थेट मुख्य रस्त्यावर पडल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या वर्दळीच्या रस्त्यावर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला होता. माधुरी सुतार यांच्या सूचनेनंतर प्रशासनाच्या आपत्कालीन पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पथकाने कटरच्या साहाय्याने फांद्या कापून बाजूला केल्या आणि रस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत मोकळा केला.

प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेबद्दल स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरातील इतर धोकादायक झाडे आणि फांद्यांची प्रशासनाने पाहणी करावी. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# 'एसआयआर' अंतर्गत कामठा रोडवर विशेष मतदार नोंदणी शिबिर



**उरण : वार्ताहर**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीचे सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रिया सुरू झाली आहे. या अंतर्गत आनंदनगर, करंजा रोड, कामगार वसाहत, कामठा, कामठा रोड आणि विमला तलाव परिसरातील मतदारांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मतदारांना इएफ फॉर्मचे वाटप आणि संकलन करण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांचे नाव मतदार यादीत कायम राहून मतदानाचा हक्क आबाधित राहण्यास मदत होणार आहे.

सोमवार १३ ते शनिवार १८ जुलै सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हॉटेल राम रतन शामियाना, कामठा रोड येथे शिबिर असणार आहे. नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका सायली म्हात्रे, दमयंती म्हात्रे यांनी परिसरातील सर्व मतदारांना या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आपला मतदानाचा हक्क हीच आपली जबाबदारी आहे. तांत्रिक कारणांमुळे कोणाचेही नाव यादीतून वगळले जाऊ नये यासाठी प्रत्येकाने हा फॉर्म भरून देणे आवश्यक आहे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. तरी संबंधित परिसरातील सर्व नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून आपली नोंदणी पूर्ण करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

# द्रोणागिरीतील सलूनमध्ये महिलेचा विनयभंग; आरोपी ताब्यात

**उरण : बातमीदार**

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. उरण पोलीस ठाणे हद्दीतील द्रोणागिरी येथील देवकृपा बिल्डिंगमध्ये असलेल्या युनिक युनिसेक्स सलून या दुकानात हेअर वॉशसाठी गेलेल्या एका महिलेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १२ जुलैला सकाळी ११ ते ११:३०च्या दरम्यान सदर महिला सलूनमध्ये हेअर वॉश करण्यासाठी गेली होती. त्यावेळी तेथे काम करणाऱ्या सोहेल शमशाद शेख (२१) या इसमाने महिलेशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीनंतर उरण पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

या घटनेमुळे द्रोणागिरी आणि परिसरातील महिलावर्गात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. युनिसेक्सच्या नावाखाली महिला आणि पुरुष दोघांसाठी एकाच ठिकाणी सेवा देणे हेच मुळात धोकादायक आहे. अशा ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत आणि त्यांच्या अब्रूला धोका आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक महिलांनी व्यक्त केली. महिलांसाठी स्वतंत्र केबिन, महिला कर्मचारी किंवा किमान सीसीटीव्हीसारख्या मूलभूत सुरक्षा व्यवस्थाही येथे नाहीत. अशा दुकानांवर त्वरित कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# सारडे शाळेतील विद्यार्थ्यांना छत्री-वह्यांची भेट

## इनरव्हील क्लबचा उपक्रम

**उरण : बातमीदार**

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील वह्यांचे ओझे कमी करणे आणि पावसाळ्यात त्यांना दिलासा देण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउनतर्फे रायगड जिल्हा परिषद शाळा सारडे येथील विद्यार्थ्यांना छत्री आणि वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन क्लब अध्यक्षा हेतल खोना, क्लब सचिव भारती विक्रमसी, डिस्ट्रिक्ट चेअरमन मोना ग्यानी, असोसिएशन प्रेसिडेंट आणि एनआर विनुथा हरीश तसेच आयआयडब्ल्यू प्रेसिडेंट इंगेलाँग विंधाम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला आकाश फाउंडेशन मुंबईच्या सेक्रेटरी संजीवनी श्रृंगारे, सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, नितीन म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, गणेश पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष विनायक म्हात्रे, उपाध्यक्षा कविता म्हात्रे, उज्ज्वला पाटील, सदस्या पूनम पाटील, ज्योत्स्ना पाटील तसेच शाळेच्या शिक्षिका अपूर्वा मॅडम, रश्मी मॅडम, सुनीता पाटील आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी बोलताना इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना यांनी क्लबच्या कार्याची माहिती दिली. समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ती मदत करणे आणि निःस्वार्थ भावनेने सेवा देणे हाच आमच्या क्लबचा प्रामुख्याने उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाबद्दल शाळेच्या शिक्षिका अपूर्वा मॅडम यांनी इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउनच्या अध्यक्षा हेतल खोना आणि संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत आणि प्रेरणा मिळते, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

# सुधागडातील नांदगाव, भेरव पूल धोकादायक!





**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात भेरव येथील आंबा नदीवरील पूल आणि नांदगाव येथील नदीचा पूल जोरदार पावसानंतर अत्यंत धोकादायक स्थितीत पोहचले आहेत. हे दोन्ही पूल पाण्याखाली राहिल्यामुळे त्यांचे अतोनात नुकसान झाले असून परिसरातील वाहतूक व्यवस्था धोक्यात आली आहे.

नांदगाव येथील पुलाजवळील रस्त्याचा मुख्य भाग पुराच्या पाण्याचा तीव्र प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणावर खचला आहे तसेच रस्त्यावरील डांबराला फुगवटा आला आहे. हा पूल पाली, पुणे, माणगाव आणि कोलाड या महत्त्वाच्या मार्गांना थेट जोडणारा मुख्य दुवा आहे. पालीवरून जाणाऱ्या शेकडो प्रवाशांसाठी हा अत्यंत सोयीचा आणि वेळ वाचवणारा रस्ता असून या पुलाची दुरवस्था झाल्यामुळे लांब पल्ल्याची वाहतूक प्रभावित झाली आहे.

दुसरीकडे सुमारे सहा ते सात दशके जुना असलेला भेरव येथील आंबा नदीवरील पूल यंदाच्या पुरात पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. येथील काँक्रीट आणि सुरक्षेचे कठडे वाहून गेले असून आतील लोखंडी सळ्या उघड्या पडल्या आहेत. हा पूल खुरावले फाट्यावरून भेरव, वाघोशी, कुंभारघर, महागाव, उद्धर, वाफेघर मार्गे पालीला जोडणारा मुख्य मार्ग आहे. या परिसरातील अनेक गावे, आदिवासीवाड्या आणि वस्त्यांसाठी हा एकमेव संपर्क मार्ग आहे.

सध्या दोन्ही पुलांची अवस्था पाहता येथून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, स्थानिक बाजारपेठ आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी नागरिकांना नाईलाजाने याच पुलांचा वापर करावा लागत आहे. एखादी मोठी दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तात्कळ या दोन्ही पुलांचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करून युद्धपातळीवर तात्पुरती डागडुजी करावी, अशी मागणी होत आहे.

## जि.प. सदस्य विकास गोगावले यांचा सडे गावात पाहणी दौरा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त व अतिदुर्गम सडे गावात चार दिवसांपूर्वी कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे जमिनीला भेगा पडल्या आहेत. या गावच्या १३ कुटुंबातील नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य विकास गोगावले यांनी सडे येथे भेट देऊन पाहणी केली.

या दौऱ्यात रायगड जिल्हा परिषदेचे अर्थ, शिक्षण व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. निलेश कुंभार, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, प्रांताधिकारी डॉ. पोपट ओमासे, तहसीलदार कपिल घोरपडे, मंडळ अधिकारी मंगेश पवार, महसूल ग्राम विकास अधिकारी सुनील वैराळे, पंचायत समिती ग्रामपंचायत विस्तार अधिकारी चिमाजी हंबीर, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी स्थलांतरित नागरिकांना मंत्री भरत गोगावले तसेच प्रशासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही विकास गोगावले यांनी दिली.

## लव्हेज गावचा पाणीप्रश्न अखेर सुटला!

### उपनगराध्यक्ष विक्रम साबळेंची यशस्वी शिष्टाई



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावात नगरपालिकेकडून होणाऱ्या अपुऱ्या व अनियमित पाणीपुरवठ्याने ग्रामस्थ विशेषतः महिला हैराण झाल्या होत्या. ग्रामस्थांनी नगरपालिकेवर मोर्चा काढण्याचे ठरवले होते, मात्र निवडक ग्रामस्थ आणि उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे, अधिकारी यांच्यात मंगळवारी (दि.१४) चर्चा झाली. यावेळी उपनगराध्यक्ष साबळे यांनी तोडगा काढल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले व भविष्यात होणारे आंदोलन स्थगित केले आहे.

गेले अनेक दिवस लव्हेज गावात अपुरा पाणीपुरवठा होत होता. याबाबत ग्रामस्थांनी अनेकदा पाणीपुरवठा खात्याला आपल्या भावना कळवल्या होत्या, मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे पाणीपुरवठा पुरेसा होत नव्हता, अशी माहिती चर्चेदरम्यान कर्मचाऱ्यांनी दिली. उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना काही सूचना केल्या व त्या उपस्थितांना मान्य झाल्या. त्यानंतर मंगळवारी दुपारपासून पाणीपुरवठा सुरळीत व पुरेसा करण्यात आला.

उपनगराध्यक्षांच्या यशस्वी शिष्टाईमुळे ग्रामस्थांना पाणी मिळाले याबाबत ग्रामस्थांनी उपनगराध्यक्षांचे आभार व्यक्त केले आहे, मात्र भविष्यात अशा घटना घडू नये याबाबत पाणीपुरवठा खात्याने दक्षता घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. यावेळी उपनगराध्यक्ष साबळे यांच्यासह पाणीपुरवठा अधिकारी भोईर, अभियंता कराळे, नगरसेवक नरेश पालांडे, ग्रामस्थ किशोर पाटील, अरुण पाटील, सोपान पाटील, महेश पाटील, जयवंत माडपे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## मोर्बा, साई आरोग्य केंद्रात कॅन्सर तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

आयुष्यमान आरोग्य केंद्र मोर्बा प्राथमिक आरोग्य केंद्र साई, ता. माणगाव येथे १४ जुलै रोजी कॅन्सर तपासणी व्हॅनमार्फत तपासणी शिबिर घेण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दीपाली पुरी याच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात ४० महिलांची तपासणी करण्यात आले असून सात आयुष्मान कार्ड काढण्यात आले

या शिबिरास जिल्हा परिषद सदस्य अस्लम राऊत, आरोग्य अधिकारी डॉ.दीपाली पुरी, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, उपसरपंच जुल्फिकार राऊत, माजी उपसरपंच राजू मोरे, हसनमिया बंदरकर, डॉ. रामदास ताडपेवर, डॉ. प्रियांका वाढवळ, अनिल ढेपे, जयवंत शिंदे, रुपाली जाधव, प्रणाली मोरे, कीर्ती अधिकारी, विधी डवले, अमृता डोंगरे आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे डोळे पुन्हा आभाळाकडे!

### पावसाने दडी मारल्याने भात लावणी खोळंबली



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेल्या पाच दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने बळीराज्याचे डोळे आभाळाकडे लागल्याचे पहावयास मिळत आहे.

आधीच पाऊस उशिरा सुरू झाला व सुरू झाल्यानंतर मुसळधार पाऊस सात-आठ दिवस पडल्यानंतर जी दडी मारली ती आजपर्यंत कायम आहे. भाताची रोपे वाढ चांगली झाली असताना या रोपांना दिवसातून एकवेळा तरी पाऊस पडणे आवश्यक असते, मात्र तो न पडल्याने रोपांचे नुकसान होण्याचा धोका असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

तळा तालुक्यातील शेती ही अधिक प्रमाणात डोंगराळ भागातील असून खडकाळ असल्याने या शेतीला दररोजच्या पावसाची गरज असते. हा पाऊस दोन दिवसांत पडण्यास पुन्हा सुरुवात झाल्यास लावणी करता येऊ शकते. मागील वर्षी या कालावधीत लावणीची कामे १००% आटोपली होती. यावर्षी मात्र पावसाची वाट पाहावी लागत आहे.

## अलिबाग एसटी आगारात वृक्षारोपण



**अलिबाग : प्रतिनिधी**

एसटी महामडंळाच्या ७८व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून अलिबाग आगाराच्या वतीने मंगळवारी (दि. १४) वृक्षारोपण करण्यात आले. उज्वल भविष्य सामाजिक संस्था आणि माणुसकी प्रतिष्ठान यांच्या सहयोगाने हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा धर्मादाय सहआयुक्त राजेश इंगोले, पोलीस अधीक्षक कार्यालयातील जिल्हा विशेष शाखेचे निरीक्षक किशोर साळे, पोलीस निरीक्षक सुनील साळुंखे उपस्थित होते.

### सामाजिक संस्थांनी घेतला पुढाकार

याचबरोबर उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष उज्वला चंदनशीव-चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व उज्वल भविष्य सामाजिक संस्था सचिव डॉ. राजाराम हुलवान, श्रीजाई फ्युचर एलएलपी संचालक डॉ. नितीन गांधी, अलिबाग आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे, स्थानक प्रमुख अभिजीत मांढरे, ॲड. निहा राऊत, ॲड.के.डी. पाटील, जागृती फाऊंडेशनच्या अध्यक्ष जागृती बेलेकर, सुरभी संस्था अध्यक्ष सुप्रिया जेधे, रोटरी क्लब अध्यक्ष सुधीर काटले, अंकुश पाटील, उज्वल सेवा दवाखाना डॉ. मंजिरी पाटील, समन्वयक ममता म्हात्रे, खंडाळे कृषी सखी सविता ओव्हाळ, उत्कर्षा गुरव, अप्सना शाह, सुरेंद्र घरत, रंजीता देवकर, श्वेता पाटील, साक्षी गायकवाड, विद्या पेढवी, वैभव पाटील, जगदीश कोळी, माधवी पिंगळे, नलिनी म्हात्रे, योगिनी काठे, मिना कांबळे आदी वेगवेगळ्या सामाजिक संस्थाचे पदाधिकारी, सदस्य, एसटी बस आगारातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## रेवदंडा बसस्थानकात वृक्षारोपण



**रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८व्या वर्धापन दिनानिमित्त हरित पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी आयोजित अभियानांतर्गत रेवदंडा बसस्थानकात वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाचे नियोजन रा.प. अलिबाग आगार, रायगड विभाग, पेण यांच्या वतीने रेवदंडा बसस्थानक नियंत्रक देवराज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले हाते. यावेळी राऊत व पत्रकार अभय आपटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नागोठण्यात अजान रोपाची लागवड



**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ रोहा व आरसी रोटरी क्लब नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र अजान रोपाची लागवड प्रसिद्ध वनस्पतीतज्ज्ञ डॉ. सचिन पुणेकर यांच्या हस्ते विठ्ठल मंदिरासमोर व जोगेश्वरी परिसरात करण्यात आली. यावेळी सुवर्ण पिंपळ बियाण्यांचे पूजन करून उपस्थितांना वाटप करण्यात आले.

या उपक्रमात रोटरी क्लबचे सचिन मोदी यांचे विशेष योगदान राहिले. कार्यक्रमास रोहिणी सतीश धारप, एपीआय पाखरे, डॉ. शेळके, श्रेया कुंटे, महेश ठाकूर, आनंद लाड, विवेक रावकर, विजय शहासने, रतन हेंडे, ज्ञानेश्वर नागोठणेकर, प्रियंका पिंपळे, धनराज उमाळे, कैलास परदेशी, गौतम जैन, मांगीलाल चौधरी, अर्पण सुटे, वर्षा जांभेकर आदी उपस्थित होते.

## कर्जत एसटी आगारात १०० झाडे लावण्याचा संकल्प

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत एसटी आगारात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आगार परिसरात शंभर वृक्ष लावण्याचा व त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प कर्मचाऱ्यांनी केला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून नगराध्यक्ष पुष्पा दगडे, नगरसेविका मानसी कानिटकर उपस्थित होत्या. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. स्थानक प्रमुख महादेव पालवे यांनी आगार परिसरात शंभर वृक्ष लावण्याचा आम्ही संकल्प केला असून प्रत्येक एसटी कामगार त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणार आहे, असे स्पष्ट केले. याप्रसंगी वाहतूक नियंत्रक बागुल, संजय कोंढार, नितीन कोळी, संतोष फराट, नागेश भरकले आदिंसह चालक, वाहक व प्रवासी उपस्थित होते.



## चोरढे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**रेवदंडा : प्रतिनिधी**



मुरूड तालुक्यातील चोरढे येथे सोमजाई माता क्रीडा मंडळ, खरसईच्या वतीने संस्थापक तथा कामगारभूषण चंद्रकांत खोत यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम नुकताच पार पडला. या उपक्रमांतर्गत दोन शाळांमधील एकूण १४० विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास चंद्रकांत खोत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे महात्मा गांधी विद्यालयाचे अध्यक्ष काशिनाथ तांबडे, राजिप शाळेचे अध्यक्ष काशिनाथ पैर, खजिनदार पांडुरंग कांबळी, ग्रामसचिव राम मंदारे, माजी अध्यक्ष नरेश भातळकर, कार्यकर्ते हिराजी पाटील, क्रीडा प्रमुख लक्ष्मण पाटील, सामाजिक कार्यकर्ते यशवंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल चोरढेकर, काशिनाथ कोकाटे, माजी विद्यार्थी दीपेश चोरढेकर, शंकर चोरढेकर, राजिप शाळेच्या मुख्याध्यापिका भगत, महात्मा गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भिडे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, खजिनदार राम भोपी, महेश डोलकर, आंबलीकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात राजिप शाळेत इयत्ता पहिली ते सातवीमधील ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. यानंतर दिनाभाई मोरे संचलित महात्मा गांधी विद्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना चंद्रकांत खोत यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले तसेच आमदार महेंद्र दळवी यांच्या विकासकामांचे कौतुक करत त्यांचा कार्यसम्राट आमदार म्हणून गौरव केला. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन अनिल चोरढेकर यांनी केले.

## खोपोलीत ४५वे अखंडित नेत्र शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

लोहाणा महाजनवाडी समाज ट्रस्ट, आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि बुज हास्य क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य नेत्र तपासणी व विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर नुकतेच झाले. लोहाणामध्ये हे ४५ वे अखंडित शिबिर होते.

लोहाणा महाजन समाज ट्रस्ट अध्यक्ष शैलेश विठलाणी, मार्गदर्शक संजय तन्ना व बुज हास्य क्लब संस्थापक बाबुभाई ओसवाल यांच्या अधिपत्याखाली या शिबिरात ४२ नेत्र रुग्ण तपासले गेले. त्यापैकी १३ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी डॉ. सुजय कोल्हापुरे यांच्यासमवेत पनवेल येथे रवाना करण्यात आले.

## खैराट ग्रामस्थांकडून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**खोपोली : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील खैराट धनगरवाडा येथील ग्रामस्थांनी स्वखर्चाने वृक्षारोपण करीत पर्यावरण संवर्धन जपण्याचा संदेश दिला आहे.

खैराट धनगरवाडा येथील ग्रामस्थांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपत पन्नास झाडे स्वखर्चाने लावून 'झाडे लावा, पर्यावरण वाचवा' असा संदेश दिला. येथील ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षपासून वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असतात.

वृक्षारोपण कार्यक्रमास हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे खालापूर तालुकाध्यक्ष तथा वावर्ले ग्रामपंचायतीचे माजी सदस्य ठकुराम झोरे, वावर्ले ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच जिजाबाई गोरे, पनवेल महापालिकेचे कर्मचारी जनार्दन झोरे, ज्येष्ठ नागरिक मोहन झोरे, लक्ष्मण आखाडे, लक्ष्मण मरगळे, बळीराम झोरे, पांडुरंग गोरे, ग्रामस्थ मालू आखाडे, जनार्दन गोरे, भाऊ गोरे, लक्ष्मण गोरे, गंगाराम हिरवे, रामचंद्र झोरे, लक्ष्मण धा.गोरे, जानू झोरे, प्रकाश झोरे, रामभाऊ कोकरे, पांडुरंग झोरे, अर्जुन आखाडे आदी उपस्थित होते.

# स्पेन फिफा वर्ल्डकप फायनलमध्ये

**अर्लिंग्टन : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपच्या उपांत्य फेरीत स्पेनने आपल्या प्रसिद्ध टिकी-टाका शैलीचा अप्रतिम नमुना सादर करत फ्रान्सचा २-० असा पराभव केला. डॅलस स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यात स्पेनने सुरुवातीपासूनच बॉल पझेशन आपल्या ताब्यात ठेवत फ्रान्सला संधीच दिली नाही. या विजयासह स्पेनने २०१०नंतर प्रथमच फायनल गाठण्याचा पराक्रम केला.

फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बाप्पे स्पेनच्या भक्कम बचावफळीसमोर पूर्णपणे निष्प्रभ ठरला. संपूर्ण सामन्यात त्याने फक्त तीन शॉट्स मारले, मात्र स्पेनचा गोलरक्षक उनाई सिमॉन याच्यासमोर तो मोठे आव्हान उभे करू शकला नाही. गोल करण्यात अपयशी ठरला असला तरी फ्रान्सकडून तोच एकमेव धोकादायक खेळाडू दिसत होता.

स्पेनच्या शिस्तबद्ध डिफेन्स आणि प्रभावी अटॅकमुळे फ्रान्सची स्टार आक्रमक फळी पूर्णपणे निष्प्रभ ठरली. स्पेनकडून मिकेल ओयारझाबाल आणि पेद्रो पोरो यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाला २-० असा विजय मिळवून दिला. या स्पर्धेतील सात सामन्यांपैकी सहाव्या सामन्यात स्पेनने प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करू दिला नाही. यावरून त्यांच्या मजबूत बचावफळीची ताकद पुन्हा एकदा दिसून आली.

स्पेनचा सामना आता रविवारी होणाऱ्या फायनलमध्ये गतविजेता अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या उपांत्य फेरीतील विजेत्या संघाशी होणार आहे. हा अंतिम सामना न्यू जर्सी येथील ईस्ट रदरफोर्ड येथे रंगणार आहे.

## उपांत्य फेरीत फ्रान्सची हार



### एम्बापे निष्प्रभ

संपूर्ण सामन्यात एम्बाप्पेने ३४ वेळा बॉलला स्पर्श केला. त्याने सहा ड्रिबल्स करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यापैकी फक्त एकदाच यश मिळाले तसेच त्याने १४ वेळा पझेशन गमावले. उपांत्य फेरीपूर्वी फ्रान्सने स्पर्धेत १६ गोल केले होते आणि सर्वाधिक गोल करणाऱ्या संघांमध्ये तो दुसऱ्या स्थानावर होता, मात्र स्पेनविरुद्ध फ्रान्सचा एक्स्पेक्टेड गोल्स आकडा केवळ ०.३ इतकाच राहिला. एम्बाप्पे अपयशी ठरल्याने संघही पराभूत झाला.

# इंग्लंड-अर्जेंटिना यांच्यापैकी कोण पोहचणार फायनलमध्ये ?



**जॉर्जिया : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ आता शेवटच्या टप्प्यात आहे. पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात स्पेनने फ्रान्सचा २-०ने पराभव करत अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे, तर दुसऱ्या सामन्यात डिफेंडिंग चॅम्पियन अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यात १६ जुलै रोजी अटलांटा येथील मर्सिडीज-बेंझ स्टेडियम येथे लढत होणार आहे.उपांत्य फेरीच्या या हाय-व्होल्टेज सामन्यात विजय मिळवणारा संघ थेट फायनलमध्ये स्पेनविरुद्ध खेळेल.

दोन्ही संघांच्या ऐतिहासिक कामगिरीवर नजर

## दुसऱ्या सेमीफायनलकडे फुटबॉल चाहत्यांचे लक्ष

टाकल्यास फिफा विश्वचषकाच्या मंचावर इंग्लंडचे पारडे अर्जेंटिनापेक्षा थोडे जड राहिले आहे. इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यात यापूर्वी विश्वचषकामध्ये पाच सामने झाले आहेत. यापैकी तीन सामन्यात इंग्लंडने, तर दोन सामन्यात अर्जेंटिनाला विजय मिळाला आहे. या ऐतिहासिक लढतींमध्ये १९८६चा तो प्रसिद्ध सामनादेखील समाविष्ट आहे, ज्यामध्ये दिएगो मॅराडोनाने हँड ऑफ गॉड गोल केला होता. यामुळे संपूर्ण फुटबॉल विश्वाचे लक्ष्य या सामन्यावर लागले आहे.

काही फुटबॉल विश्लेषकांच्या अनुसार या सामन्यात कोणत्याही एका संघ स्पष्ट प्रबळ मानला जात नाही आहे. इंग्लंडच्या विजयाची शक्यता ३५.१% आणि अर्जेंटिनाच्या विजयाची शक्यता ३१.८% आहे, तर निर्धारित वेळेत हा सामना ३३.१% ड्रॉ (बरोबरी) होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# पहिल्या वनडेत भारताचा इंग्लंडवर दणदणीत विजय

## अक्षर-वॉशिंग्टनची कमाल!



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारताने इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेची विजयी सुरुवात करत पहिल्या सामन्यात सहा विकेट्सने दमदार विजय मिळवला. अष्टपैलू अक्षर पटेलच्या शानदार कामगिरीच्या जोरावर टीम इंडियाने १-० अशी आघाडी घेतली. त्याला वॉशिंग्टन सुंदरने सुरेख साथ दिली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडचा डाव भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच विस्कळीत केला. १०७ धावांत सहा फलंदाज बाद झाल्यानंतर जो रूट (७६*) आणि लियाम डॉसन (६८) यांनी १२१ धावांची भागीदारी करत इंग्लंडला २५८ धावांपर्यंत मजल मारून दिली. भारताकडून अक्षर पटेलने चार विकेट्स घेत इंग्लंडच्या फलंदाजीला मोठा धक्का दिला.

२५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अनुभवी फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना या सामन्यात मोठी खेळी करता आली नाही. रोहितने २१ चेंडूत ११, तर विराटने सहा चेंडूत केवळ पाच धावा केल्या. शुबमन गिलने ७५ चेंडूत ८० धावांची शानदार खेळी केली. त्याने ११ चौकार आणि एक षटकार लगावत भारताचा डाव सावरला, मात्र फलंदाजीदरम्यान त्याला क्रॅम्पचा त्रास जाणवू लागल्याने अखेर त्याला रिटायर्ड हर्ट होऊन मैदान सोडावे लागले. यानंतर भारताची अवस्था १६०/४ अशी झाली होती. अशा वेळी अक्षर पटेल (५७*) आणि वॉशिंग्टन सुंदर (५२*) यांनी नाबाद १०२ धावांची भागीदारी करत भारताला ४५.२ षटकांत विजय मिळवून दिला. वनडे मालिकेतील दुसरा सामना १६ जुलै रोजी कार्डिफ येथे होणार आहे.

# मेस्सीला मागे टाकण्याची एम्बापेची संधी हुकली!

## 'हॅट्ट्रिक फायनल'चे स्वप्नही भंगले

**न्यूयॉर्क** : फ्रान्सचा स्टार स्ट्रायकर किलियन एम्बाप्पे याचे सलग तिसऱ्यांदा फिफा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचण्याचे स्वप्न स्पेनने उद्ध्वस्त केले. उपांत्य फेरीत स्पेनकडून ०-२ अशा पराभवानंतर फ्रान्सचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. या पराभवासोबतच म्बाप्पेला लिओनेल मेस्सीचा विश्वचषकातील गोलांचा विक्रम मागे टाकण्याची संधीही गमवावी लागली.



विश्वचषक २०२६मध्ये आतापर्यंत लिओनेल मेस्सी आणि किलियन एम्बाप्पे या दोघांच्या खात्यात प्रत्येकी आठ गोल आहेत, मात्र तीन असिस्टच्या जोरावर एम्बाप्पे गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहे. आता अर्जेंटिनाचा कर्णधार मेस्सी इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत गोल करण्यात यशस्वी ठरला, तर तो पुन्हा गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडी घेऊ शकतो. विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणाऱ्यांमध्ये मेस्सीला मागे टाकण्याची मोठी संधीही एम्बाप्पेकडे होती, मात्र स्पेनविरुद्धच्या पराभवामुळे त्याचे हे स्वप्न अपूर्ण राहिले.

# शोएब अख्तर, आसिफ भारतात येताना ड्रग्ज आणायचे!

## गृह मंत्रालयाच्या माजी अधिकाऱ्याचा गौप्यस्फोट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजनैतिक तणावादरम्यान आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि क्रीडा जगताला हादरवून सोडणारा खळबळजनक दावा समोर आला आहे. भारताच्या गृह मंत्रालयाचे माजी अंडर सेक्रेटरी आरव्हीएस मणी यांनी, शोएब अख्तर आणि मोहम्मद आसिफ यांसारखे स्टार क्रिकेटपटू जेव्हा जेव्हा भारत दौऱ्यावर यायचे, तेव्हा ते स्वतःसोबत ड्रग्जचा मोठा साठा घेऊन यायचे आणि या संपूर्ण काळ्या धंद्यामागे पाकिस्तानची गुप्तहेर संघटना 'आयएसआय'चा हात होता, असा खळबळजनक आरोप केला आहे.



आरव्हीएस मणी हे २००६ ते २०१० या काळात गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागात कार्यरत होते आणि त्यांच्याकडे जम्मू-काश्मीरसह दहशतवादाशी संबंधित अत्यंत संवेदनशील फाईल्सची जबाबदारी होती. 'एएनआय' या वृत्तसंस्थेच्या पॉडकास्टमध्ये बोलताना त्यांनी मंत्रालयातील आपल्या कार्यकाळातील एका गुप्त अहवालाचा हवाला देत म्हटले, क्रिकेटपटू शोएब अख्तर आणि मोहम्मद आसिफ यांनी स्वतः पाकिस्तानी हाय कमिशनरसमोर कबुली दिली होती की, ते भारतात ड्रग्ज घेऊन आले आहेत. हा प्रकार उघड होताच त्यांना तातडीने मायदेशी रवाना करण्यात आले होते. पाकिस्तानची कोणतीही टीम किंवा डेलिगेशन भारतात येत असे, तेव्हा ते वैयक्तिक वापरासाठी नाही तर व्यावसायिक हेतूने ड्रग्जची तस्करी करायचे, असेही त्यांनी सांगितले.

**'बॉब वूल्मर यांची कट रचून हत्या'**

भारताच्या गृह मंत्रालयाचे माजी अंडर सेक्रेटरी आरव्हीएस मणी यांनी पुढे बोलताना, ही घटना घडल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत म्हणजेच मार्च २००७मध्ये वेस्ट इंडिजमधील वर्ल्ड कपदरम्यान पाकिस्तान क्रिकेट संघाचे इंग्लिश प्रशिक्षक बॉब वूल्मर यांचा हॉटेलच्या खोलीत संशयास्पद मृत्यू झाला. वूल्मर हे पाकिस्तानी खेळाडूंच्या या ड्रग्ज नेटवर्कचा तीव्र विरोध करत होते, म्हणूनच त्यांची कट रचून हत्या करण्यात आली, असा संशय व्यक्त केला आहे.

## पराभवानंतर फ्रान्समध्ये जाळपोळ, तोडफोड

**पॅरिस** : फिफा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत स्पेनकडून झालेल्या पराभवानंतर फ्रान्समध्ये काही ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. फ्रान्सच्या संघाचे अंतिम फेरीत पोहचण्याचे स्वप्न भंगल्यानंतर संतप्त चाहत्यांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. काही ठिकाणी गोंधळ, तोडफोड आणि जाळपोळीच्या घटना समोर आल्या आहेत.


सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओंमध्ये रस्त्यांवर गर्दी, गोंधळ आणि पोलिसांशी झटापट झाल्याचे दिसून येत आहे. विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेतील पराभवामुळे चाहत्यांच्या भावनांना उधाण आले. प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.




श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर

वर्ष २३ वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३

# पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

**गुरुवार, दिनांक १६/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा) बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण),श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर, गायीका : श्रीमती. हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत, श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर, गायीका : सौ. सुप्रिया घरत वादक : तुषार घरत, टाळकरी - सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर, गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ (कोपर), बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर) पखवाज : वैष्णव देशमुख |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | **प्रभोदनकार :** ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे, श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक : ह.भ.प. आदित्य पाटील, गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा), पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻**

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

**✻ व्यवस्थापक ✻**

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

**✻ संयोजक ✻**

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com